एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
१०४ शतकोत्तर वाटचाल
• मुंबई, सोमवार २२ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१०९, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 109 Marathi - Daily - Mumbai, 22 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in
Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
सगळेच निर्दोष, मग पवनराजेंना मारलं कोणी?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# प्रत्येक फुटीर जे कारण देतो तेच दिले
## निधी मिळत नाही! निंबाळकरांनी उबाठा सोडली

मी अजूनही पक्षप्रवेशाबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही, असे काल जाहीरपणे म्हणणारे धाराशीवचे उबाठाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी आज आपण एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले. हा निर्णय घेताना प्रत्येक लोकप्रतिनिधी जे कारण देतो, तेच विकासकामांसाठी निधी मिळत नसल्याचे कारण त्यांनी दिले. आज त्यांनी गोवर्धनवाडी येथील आपल्या कार्यकर्त्यांशी तब्बल चार तास चर्चा केली. मात्र ही चर्चा म्हणजे एक नाटकच होते. या चर्चेनंतर ते म्हणाले की, लोकांनी आम्हाला अपेक्षेने निवडून आणले. पण साधी ट्रान्सफॉर्मरची कामे होत नव्हती. त्यामुळे मी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतला.



■ धाराशिव

**ओमराजे** निंबाळकर म्हणाले की, मी धाराशिवात आल्यानंतर सगळ्या कार्यकर्त्यांची चर्चा आणि मते जाणून घेतली. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकात आपल्या उमेदवारांचा दारुण पराभव झाला होता. त्यासोबत मी सामान्य लोकांसाठी २४ तास प्रामाणिकपणे कामे केली. मी आमच्या कामात कमी पडलो नाही. सत्तेत नसल्यामुळे काम करताना लोकप्रतिनिधी म्हणून अडचणी येत होत्या. त्यामुळे सर्वांच्या मताने मी निर्णय घेतला आहे की, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असून, त्यांच्या नेतृत्वात काम करणार आहे. काही लोक म्हणतात की, मी निकाल लावण्यासाठी गेलो होतो. पण जर तसे असते, तर मी २२ तारखेलाच गेलो असतो ना? उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भागातील प्रश्नांची आणि कार्यकर्त्यांची दखल घेतली आहे. निकाल आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे साहेब यांच्याशी माझे बोलणे झाले, त्यांनी अमित शहा यांच्याशी देखील माझे बोलणे करून दिले. आम्ही त्यांना इतकीच विनंती केली आम्हाला कोणाचा फेवर नकोय, पण आम्ही जो संघर्ष मागच्या २० वर्षांपासून करत आहोत, न्याय मागत आहोत आणि तो न्याय आम्हाला मिळाला पाहिजे. त्यानंतर स्वतः एकनाथ शिंदे यांनी समोर येऊन म्हटले होते की, सीबीआय त्या ठिकाणी हायकोर्टात अपील दाखल करणार आहे.

फुटीर खासदार ओमराजे निंबाळकर यांचे बंड थोपवण्यासाठी उबाठाने मध्यरात्री पक्षाचे सरचिटणीस वरुण सरदेसाई आणि आमदार कैलास पाटील यांना पुण्यातील ओमराजेंच्या निवासस्थानी पाठवले. या गुप्त भेटीत त्यांची मनधरणी करण्यात आली. ही भेट अत्यंत गोपनीय ठेवण्यात आली होती. या भेटीनंतर सरदेसाई यांनी पवनराजे हत्या प्रकरणाच्या निकालामुळे निंबाळकर कुटुंब खचले असल्याचे सांगत, त्यांची विचारपूस करण्यासाठी आलो होतो असे म्हटले. मात्र ओमराजे निंबाळकर हे उबाठा पक्ष सोडणार हे तोपर्यंत निश्चित झाले होते. ओमराजे यांना बळ देण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी पुण्याहून तानाजी सावंत यांना त्यांच्याकडे पाठवले आहे. ओमराजे निंबाळकर पुण्याहून निघताना पान ७ वर

### राजुल पाटील तूर्त ठाकरेंच्या बरोबरच



बंडखोर संजय दिना पाटील यांच्या समर्थनात मुंबईत शिंदे सेनेने जोरदार बॅनरबाजी केली. त्यानंतर उबाठामध्ये असलेल्या त्यांच्या कन्या नगरसेवक राजुल पाटील या आज उध्दव ठाकरे यांना भेटायला मातोश्रीवर गेल्या. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्या म्हणाल्या की माझ्या वडिलांनी जो निर्णय घेतला तो ते सांगतील, मी उबाठातच आहे. राजुल पाटील या पहिल्यांदाच नगरसेविका झाल्या आहेत. उबाठाच्या स्थानिक कार्यकर्तीला डावलून संजय दिना पाटील यांच्या आग्रहाखातर त्यांना उध्दव ठाकरे यांनी तिकीट दिले असे संजय राऊत यांनी सांगितले होते. राजुल पाटील यांनी आज पक्ष सोडला तर त्यांचे नगरसेवक पद जाते. यामुळेच त्या उबाठा सोबत राहिल्या आहेत अशी चर्चा आहे. सुषमा अंधारे यांनी राजुल पाटील यांच्यावर टीका करताना म्हटले की वडिलांनी अशा पध्दतीने पक्ष सोडल्यावर आता आम्हाला त्यांच्या कन्येवर अजिबात विश्वास राहिलेला नाही.

## 'नीट'ची पुनर्परीक्षा अखेर कडेकोट सुरक्षेत पार पडली



**पेपरफुटीमुळे पुन्हा घ्यावी लागलेली नीट परीक्षा आज देशभरात अत्यंत कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत निर्विघ्नपणे पार पडली. यापूर्वी झालेला घोळ लक्षात घेऊन परीक्षा केंद्रांवर कडक तपासणी, सीसीटीव्ही आणि जॅमरची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच या परीक्षेसाठी २ लाखांहून अधिक कर्मचारी तैनात करण्यात आले होते. मात्र अजमेर, अहमदाबाद आणि गुरुग्राम येथील केंद्रांवर बुरखा, हिजाब, कलावा (गंडा) आणि धार्मिक प्रतीकांवरून वाद निर्माण झाले. तर मुंबईसह काही ठिकाणी उशिरा पोहोचलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारल्याने केंद्रांबाहेर काहीसा गोंधळ उडाला.**

■ मुंबई

**देशभरातील** ५५१ शहरांतील ५,४४० केंद्रांवर आणि परदेशातील १४ केंद्रांवर २२.७९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. एनटीएच्या माहितीनुसार, ९५ हजारांहून अधिक परीक्षा कक्षांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा, १.३८ लाखांहून अधिक कॅमेरे आणि ५१ हजारांहून अधिक जॅमर लावण्यात आले होते. मात्र, काही ठिकाणी किरकोळ कारणावरून वाद झाला. राजस्थानमधील अजमेर येथे कुलसुम बानो नावाच्या पान ७ वर

## रेवती सुळे-सारंग लखानी विवाह
### अदानी, अंबानी सहकुटुंब उपस्थित

■ मुंबई

**राष्ट्रवादीच्या** नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या कन्या रेवती सुळे यांचा विवाह भाजपा नेते तसेच उद्योगपती अरुण लखानी यांचे पुत्र सारंग लखानी यांच्यासोबत मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या विवाहसोहळ्याची देशभरात चर्चा रंगली असून,



### संजय दिना पाटील रात्री १२ वाजता उपस्थित

उबाठाचे बंडखोर खासदार संजय दिना पाटील यांनी या विवाहसोहळ्याला थेट मध्यरात्री १२ वाजता हजेरी लावली. विवाहस्थळी पोहोचताच प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी त्यांना घेरले. पण कोणतीही प्रतिक्रिया न देता त्यांनी कॅमेऱ्यासमोर केवळ हात दाखवून पुढे निगून गेले.

या लग्नाचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे पान ७ वर

## विधान परिषद निवडणुकीचा निकाल आज जाहीर होणार

■ मुंबई

**राज्य** विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुकीचा निकाल आज जाहीर होणार आहे. महायुतीने मतदानापूर्वीच १७ पैकी ६ जागांवर बिनविरोध विजय मिळवला आहे. उर्वरित ११ जागांच्या निकालाकडे लक्ष लागले आहे.

निवडणुकीदरम्यान अमरावती मतदारसंघात काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला होता. पक्षाने 'व्हिप' देत तटस्थ राहण्याचे निर्देश दिले असतानाही काही नगरसेवकांनी मतदानात सहभाग घेतला होता. तर नाशिक मतदारसंघात अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी बंडखोरी केली होती. नंतर त्यांनी माघार घेतली होती. मात्र, अर्ज मागे घेण्याची तारीख उलटून गेल्याने त्यांचे नाव मतपत्रिकेवर कायम राहिले. प्रसाद हिरे यांचेही नाव मतपत्रिकेवर असल्याने तिन्ही उमेदवारांमुळे शेवटपर्यंत सस्पेन्स कायम राहिला आहे. या मतदारसंघात एकूण ६१९ मतदार होते. त्यापैकी मालेगाव येथील एक नगरसेवक हज यात्रेला गेल्याने मतदान करू शकला नाही.

## पाणी, अन्न, वीज रोखले! आम्ही दहशतवादी आहोत का?
### कॉकरोच दीपकेचा केंद्र सरकारला संतप्त सवाल

■ नवी दिल्ली

**नीट** पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी जंतर-मंतरवर कॉकरोच जनता पार्टीचे बेमुदत आंदोलन आज दुसऱ्या दिवशीही सुरूच होते. काल हे आंदोलन सुरू झाले. रात्री आंदोलक मैदानावर उघड्यावरच झोपले. मंत्र्याने राजीनामा दिल्याशिवाय हटणार नाही असा निर्धार दीपके याने केला आहे. कॉकरोच पार्टीचा संस्थापक अभिजित दीपके याने आज पोस्ट करीत केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले. तो म्हणाला की, आंदोलनस्थळी पाणी, अन्न आणि वीजपुरवठा रोखण्यात आला आहे. आम्हाला त्रास दिला जात आहे. आम्ही विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी लढत आहोत, मग आम्हाला दहशतवाद्यांसारखी वागणूक का दिली जात आहे? असा संतप्त सवाल केला.



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार व्यक्त करत दीपके याने देशभरातील विद्यार्थी, युवक, शेतकरी आणि कामगारांना जंतर-मंतरवरील आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहनही केले. आज नीटची परीक्षा देऊन विद्यार्थ्यांनी आंदोलनात सामील व्हावे, असे आवाहनही त्याने केले. दिल्ली पोलिसांनी काल सायंकाळी आंदोलनाची परवानगी संपल्याचे सांगून आंदोलकांना जागा रिकामी करण्यास सांगितले होते. मात्र पर्यायी जागा मिळेपर्यंत जंतर-मंतरवरील पान ७ वर

## राम मंदिर ट्रस्टच्या विश्वस्ताने ४० टक्के कमिशन मागितल्याचा दावा

■ अयोध्या

**राम** मंदिराशी संबंधित वादाच्या पार्श्वभूमीवर श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट विरुद्ध नवे आरोप झाले आहेत. मंदिर संकुलातील बांधकामांच्या देखरेखीशी संबंधित निवृत्त अभियंता दीनानाथ वर्मा यांनी आरोप केला आहे की, ट्रस्टचे वरिष्ठ विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांनी एका कंत्राटदाराकडे ४० टक्के कमिशनची मागणी केली आहे.

सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या एका मुलाखतीत वर्मा यांनी दावा केला की, ट्रस्टच्या कार्यालयीन इमारतीसाठी काम करणाऱ्या अॅल्युमिनियम कंत्राटदाराकडे ४० टक्के कमिशन मागण्यात आले होते. हे कमिशन देण्यासाठी प्रकल्पाचा अंदाजित खर्च आणि बिलही त्याच प्रमाणात वाढवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. वर्मा म्हणाले की, त्यांनी या मागणीला विरोध केला आणि हा प्रकार ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांच्या निदर्शनास आणून दिला. त्यांनी संभाषणाची ऑडिओ रेकॉर्डिंगदेखील राय यांना ऐकवली होती. मात्र, या प्रकरणात कारवाई करण्याऐवजी स्वतः लाच प्रकल्पातून हटवण्यात आल्याचा दावा वर्मा यांनी केला आहे. सध्या या आरोपांबाबत संबंधित विश्वस्त किंवा ट्रस्टकडून अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नसून, या प्रकरणामुळे राम मंदिर ट्रस्टभोवतीचा वाद अधिकच वाढण्याची शक्यता आहे.

## १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन

देशभर योगसाधना

■ नवी दिल्ली

**१२ वा** आंतरराष्ट्रीय योग दिन आज देशभरात आणि जगभरात मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावर्षी 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून लाखो नागरिकांनी सामूहिक योगाभ्यासात भाग घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली कोलकात्यातील रेड रोड येथे मुख्य कार्यक्रम पार पडला. देशातील विविध राज्यांमधील शाळा, महाविद्यालये, सरकारी



मरीन ड्राईव्हवर नागरिकांनी योग दिनात सहभाग घेतला. (छाया - दीपक साळवी)

कार्यालये, ऐतिहासिक स्थळे तसेच सार्वजनिक मैदानांवर योग शिबिरांचे आयोजन करण्यात आले. भारतीय लष्करानेही सियाचीनसारख्या अत्यंत प्रतिकूल भागात योग सत्रांचे आयोजन केले. नवी दिल्लीतील करिअप्पा मैदानावर ३,५०० हून अधिक सैनिक, माजी सैनिक आणि नागरिकांनी योगाभ्यास केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पान ७ वर

## 'बेस्ट'चा संप तिसऱ्या दिवशी मागे

■ मुंबई

**विविध** मागण्यांसाठी बेस्ट कामगारांचा संप आज तिसऱ्या दिवशी सुरुच होता. त्यामुळे मुंबईकरांचे हाल सुरूच होते. या संपावर तोडगा काढण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सह्याद्री अतिथीगृह येथे रात्री बैठक झाली. या बैठकीत सकारात्मक चर्चेनंतर काही मागण्या मान्य झाल्या. या बैठकीनंतर संप मागे घेण्यात आल्याचा निर्णय कृती समितीने जाहीर केला.

कर्मचाऱ्यांची प्रलंबित ग्रॅच्युईटीची रक्कम याच आर्थिक वर्षात अदा करण्याचा तसेच नवीन वेतन करार होईपर्यंत कर्मचाऱ्यांना अंतरिम दिलासा म्हणून बेस्टच्या कायम कर्मचाऱ्यांना ३००० रुपये आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना २००० रुपये मासिक हंगामी वाढ देण्याचे मान्य करण्यात आले. या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सचिन अहिर, आमदार मुरजी पटेल, उपमुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, बेस्टच्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी, तसेच बेस्ट कर्मचारी कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. बेस्ट बस सेवा तत्काळ सुरू करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. कर्मचाऱ्यांची प्रलंबित ग्रॅच्युईटीची रक्कम याच आर्थिक वर्षात अदा करण्यात यावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी पुढील तीन वर्षांत ५००० नवीन बसेस स्वतःच्या मालकीच्या घेण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद नियोजित पद्धतीने करण्याचे निर्देश यावेळी दिले.

**तृणमूल काँग्रेस पक्षाच्या सुमारे ४४० रुपये कोटी रक्कम असलेल्या तीन बँक खात्यांवरील व्यवहार गोठवण्यात आले आहेत. पक्षातील बंडखोर आमदारांनी या निधीच्या स्त्रोताची चौकशी करण्याची मागणी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. एका खासगी बँकेत असलेल्या या तीन खात्यांवर 'डेबिट फ्रीझ' लावण्यात आला आहे. त्यामुळे खात्यांमधून पैसे काढता येणार नाहीत.**

## तृणमूल काँग्रेसच्या ४४० कोटी रुपयांची बँक खाती गोठवली

■ कोलकाता

**विधानसभा** निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल पक्षात संघटनात्मक आणि आर्थिक नियंत्रणावरून संघर्ष तीव्र झाला आहे. पक्षात मोठ्या संख्येने बंडखोरी झाली आहे. माजी मंत्री अरूप बिस्वास आणि विरोधी पक्षनेते रितब्रता बनर्जी यांच्या गटांमध्ये वर्चस्वाची लढाई सुरू असल्याचे सांगितले जात आहे. रितब्रत बॅनर्जी समर्थक १० आमदारांनी बिधाननगर सायबर क्राईम पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून खात्यांमध्ये जमा झालेल्या निधीचा स्त्रोत आणि त्यातील व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी केली होती. त्यानंतर गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला.



दरम्यान, दिल्लीहून कोलकात्यात येणारे तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बनर्जी यांच्या आगमनापूर्वी कोलकाता विमानतळावर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. तृणमूल काँग्रेसने त्यांच्या सुरक्षेला धोका असल्याचा आरोप करत भाजपावर हल्ल्याचा कट रचल्याचा आरोप केला आहे.

## बंडखोर खासदारांच्या मतदारसंघात उद्धव ठाकरेंचा तीन दिवस दौरा

■ मुंबई

**उबाठा** पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे बंडखोर खासदारांच्या मतदारसंघात थेट जाऊन पक्षाची ताकद दाखवण्याच्या तयारीत आहेत. २७ , २८ आणि २९ जून असे तीन दिवस हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यात ते कार्यकर्त्यांशी संवाद साधत संघटन मजबूत करण्यावर भर देणार आहेत.

दौऱ्याची सुरुवात शनिवारी २७ जून रोजी यवतमाळ येथून होणार आहे. याच दिवशी ठाकरे हिंगोलीतही भेट देणार असून, दिवसअखेर परभणी येथे मुक्काम करणार आहेत. त्यानंतर २८ जून रोजी परभणी आणि धाराशिव दौरा व बैठकांचा कार्यक्रम पार पडल्यानंतर ठाकरे छत्रपती संभाजीनगर येथे मुक्कामी असतील. दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच २९ जून रोजी ठाकरे शिर्डीत जाणार असून, तेथील कार्यक्रमानंतर मुंबईकडे रवाना होणार आहेत. या दौऱ्याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून, बंडखोर खासदारांच्या मतदारसंघात जाऊन ठाकरे नेमके काय म्हणतात याची उत्सुकता निर्माण झाली आहे.


## मुंबईसह कोकणात पाऊससरी दोन दिवसांसाठी यलो अलर्ट

■ मुंबई

**मुंबईसह** कोकणातील अनेक भागांत आज सकाळपासून पावसाने दमदार हजेरी लावली. हवामान विभागाने २० जूननंतर राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज वर्तवला होता. त्यानुसार आज मुंबईत चांगला पाऊस होऊन वातावरणात काहीसा गारवा निर्माण झाला.

मुंबईतील विविध भागांत पहाटेच्या सुमारास चांगल्या पावसाची नोंद झाली. घाटकोपरमध्ये २४ मिमी, वरळीत २५ मिमी, लोअर परळमध्ये २१ मिमी आणि चेंबूरमध्ये २० मिमी पाऊस झाला. भारतीय हवामान विभागाने मुंबईसाठी २२ आणि २३ जून रोजी यलो अलर्ट जारी केला आहे. या कालावधीत ३० ते ४० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहून विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातही आज मुसळधार पाऊस झाला. कणकवली तालुक्यासह कुडाळ परिसरात जोरदार



सरी कोसळल्या. पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, खरीप हंगामातील शेतीकामांना वेग येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २२ ते २३ जूननंतर कोकण किनारपट्टीवर मान्सून अधिक सक्रिय होण्याची शक्यता आहे.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

### पाहिजेत

बँक जॉबसाठी मुला, मुलींची भरती. पगार 18800/- ते 35000/- **8788968016** {NC260978}

स्किन Clinic साठी staff पाहिजे (Receptionist/ Nurse), Naupada, thane. संपर्क- **9137792915** {NC260983}

पेस्ट कंट्रोल कंपनीला मुंबई, गोवा, लोणावळा, गुजरातमधील, सहाय्यक, ऑपरेटर, पर्यवेक्षक पाहिजेत. राहण्याची सोय (पगार- १५,०००/-+ बेनिफिट). - **9930016908/ 8291819117** {NC260944}

गोरेगांवमध्ये इमिटेशन कामासाठी मुली पाहिजेत आकर्षक पगार संपर्कः **9769737444/ 8169195899** {NC260873}

सुरक्षारक्षक, हाऊसकीपिंग, सुपरवायझर, पँट्रीबॉय- दादर, वरळी, मुंबई सेंट्रल, ठाणे, **8291056761/ 8422880511/ 8422880515 / 9326200875** {NC260942}

पाण्याच्या टाक्या साफ करण्यासाठी हेल्पर पाहिजेत. ठाणे संपर्क- **9323357155/ 8369602176** {NC260977}

शिवडीमध्ये कोमोरी लिथरॉन ५ कलर मशीनकरीता अनुभवी बॉयलर पाहिजे. त्वरीत संपर्क करा- **9082517355** {NC260945}

कुर्ला (वेस्ट) येथील प्रिंटींग प्रेसमध्ये लॅमिनेशन मशीन ऑपरेटर, फिडर, हेल्पर्स पाहिजेत. संपर्कः **9870532327.** {NC260960}

महानगर गॅसच्या मीटर रीडिंगसाठी बाईकर पाहिजेत. एरिया कल्याण आणि नवीमुंबई. प्रति रिडिंग 40/- दिव्यम एक्सप्रेस **9820385767/ 7208993036** {NC260995}

स्क्रीन पेंटिंग राऊंड पेंटर पाहिजे मस्जिद बंदर **9820877126** {NC261007}

### पाहिजेत

कन्स्ट्रक्शन कंपनीच्या साईट वर हाऊसकिपिंग कामासाठी हेल्पर पाहिजेत पगार+ पीएफ+इ एस आय सी+ इतर फायदे. संपर्क- **9967567272** {NC261008}

पेस्ट कंट्रोल कामासाठी बोरिवली / वसई ऑफिस टेक्निशियन / सेल्ससाठी मुले / मुली पाहिजे. **9819660542** {NC260923}

सोसायटी मध्ये हाऊसकीपींगसाठी मुले पाहिजे, ग्रॅन्टरोड, चिंचपोकळी, संपर्क **9699927271** {NC260954}

मुंबईत हेल्थ सर्वेसाठी ॲक्टिव्ह मुली/महिला पाहिजेत. पगार 15000/-+ रेल्वे पास. संपर्कः **9223269345** {NC260972}

पॅकिंग मटेरियलच्या कामासाठी मुले / मुली पाहिजेत. कोहिनूर मिल चाळ, बिल्डिंग नंबर १/१७ महात्मा जोतिबा फुले मार्ग, दादर पूर्व. **7977308471** {NC260835}

स्त्री पुरुष वृद्धाश्रमात कामासाठी पाहिजे. मोफत राहण्याची खाण्याची सुविधा **7040206848** {NC260835}

प्युनच्या जागेसाठी मुले पाहिजेत. शिक्षण 10वी ते 12वी. वयोमर्यादा 20-30. Accotax Consultancy Services 7, हालिमा बिल्डींग, तिसरा मजला, नानाभाई लेन, फोर्ट, मुंबई-400001. फोन नं.:- **9819830286** {NC260981}

अनुभवी टेम्पो ड्रायव्हर आणि ऑफीसच्या कामासाठी मुलगा मालाड ईस्टमध्ये पाहिजे. संपर्कः **9320116263** {NC261012}

2 ऑफसेट प्रिंटिंग मशीनसाठी फीडरमेन, बॉलर (बॉयलरमेन) आणि हेल्पर पाहिजेत (1) हेडलबर्ग 2 कलर SORMZ अलकलर आणि (2) सोलना 4 कलर. संपर्क लुखाडिया प्रिंटर्स माझगाव मुंबई १०. **7977794971, 022-45181411** {NC261003}

### पाहिजेत

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार + जेवण + निवास मोफत) घरकुल केअर सेंटरः **9819426634/ 9969529162** {NC260938}

लोन रिकवरी करण्यासाठी ठाणेयेथे मुले, मुली, स्त्री, पुरुष पाहिजेत. **9326370962** {NC260989}

मुंबईत विलेपार्ले येथे एर्टिगा गाडी चालविण्यासाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. **9867354944** {NC261009}

### Situation Vacant

REQUIRED MALE/ FEMALE STAFF FOR TENDER & ACCOUNTS ASSISTANT (EXCEL & WORD). MIRAROAD FOR PVT LTD. FIRM. **8097641616.** {NC260967}

Wanted Sales Persons for expansion of market in Maharashtra for Legal Publications & Legal Software. Graduates/ Undergraduate, age below 30. Salary + Incentives can earn 25,000 + Monthly. Send Bio-Data on Whatsapp **8169822945/ 9833905062** {NCC260025}

Wanted experienced Security Guards 8 hour duty at Andheri. Salary 22,222 in hand, Age 25–45 years,10th pass. Contact: **9769733808/ 9920265246.** {NC260990}

**वाचकांना सूचना**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
- मॅनेजर, 'नवाकाळ'

# १६ फिक्स्ड-डोस कॉम्बिनेशन औषधांवर बंदी! केंद्राचा निर्णय

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** आरोग्य मंत्रालयाने देशात १६ फिक्स्ड-डोस कॉम्बिनेशन औषधांच्या उत्पादन, विक्री आणि वितरणावर तात्काळ प्रभावाने बंदी घातली आहे. वैज्ञानिक तपासणीनंतर या औषधांचे संयोजन वैद्यकीयदृष्ट्या योग्य नसल्याचा निष्कर्ष समोर आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

एफडीसी (फिक्स्ड-डोस कॉम्बिनेशन) म्हणजे दोन किंवा अधिक सक्रिय औषधी घटक निश्चित प्रमाणात एकत्र करून तयार केलेली औषधे आहे. या औषधांच्या सुरक्षितता आणि परिणामकारकतेचा आढावा घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तपासणी करण्यात आली होती.यासाठी ड्रग्स टेक्निकल डव्हायजरी बोर्ड (डीटीएबी) यांनी तज्ज्ञ समिती नेमली होती. समितीने विविध औषधांच्या संयोजनांचा अभ्यास करून काही औषधे अवैज्ञानिक, उपचारात्मकदृष्ट्या अयोग्य आणि संभाव्यतः हानिकारक असल्याचे नमूद केले.

या बंदीमुळे बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक औषधांच्या मिश्रणावर गदा आली आहे. यामध्ये प्रामुख्याने काही अँटिबायोटिक्स, वेदनाशामक गोळ्या, पोटदुखीवर वापरली जाणारी औषधे आणि त्वचारोगांवर वापरल्या जाणाऱ्या काही क्रीम्सचा समावेश आहे.

# पंजाबमध्ये सरकारी बस कंत्राटी कामगारांचे २४ जूनपासून चक्काजाम

■ जालंधर



**पनबस-पीआरटीसी** कंत्राटी कामगार संघटनेने २२ जूनला नियोजित केलेला आपला संप दोन दिवस पुढे ढकलला. या संघटनेने आता २४,२५ आणि २६ जूनला संपूर्ण पंजाबमध्ये सरकारी बसेस रोखण्याची आणि मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर धरणे आंदोलन करण्याचे जाहीर केले. नीट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे संघटनेचे म्हणणे.

राज्यस्तरीय बैठकीत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रेशम सिंग गिल यांनी आरोप केला की,सरकार कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची अंमलबजावणी करण्याऐवजी सातत्याने त्याकडे दुर्लक्ष करत आहे.३ वर्षांहून अधिक काळ लोटूनही विभागात एकाही कंत्राटी कर्मचाऱ्याला नियमित करण्यात आलेले नाही. नवीन सरकारी बसगाड्याही दाखल करण्यात आलेल्या नाहीत.याउलट खाजगी बसगाड्यांना प्रोत्साहन देऊन विभागाच्या खाजगीकरणाच्या प्रक्रियेला अधिक गती दिली जात आहे. संघटनेचे महासचिव शमशेर सिंग ढिल्लन म्हणाले की,कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी सरकारने कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत. खाजगीकरणाला विरोध करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तुरुंगात टाकून त्यांचा आवाज दाबण्याचे प्रयत्न केले जात आहे.

## देश विदेश

# कुंभमेळा फेम मोनालिसाला सुरक्षा मिळणार! हायकोर्टाचे निर्देश

■ नवी दिल्ली



**प्रयागराज** कुंभमेळ्यादरम्यान चर्चेत आलेल्या इंदूरच्या मोनालिसाला केरळ हायकोर्टाने पोलीस संरक्षण देण्याचे आदेश दिले.आपल्या जीवाला धोका असल्याचे कारण देत या तरुणीने संरक्षणासाठी केरळ हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० जुलै रोजी होणार आहे. आंतरधर्मीय विवाहामुळे आणि तिच्या वयावरून सुरू असलेल्या कायदेशीर वादादरम्यान तिला सोशल मीडियावरून आणि अज्ञात व्यक्तींकडून गंभीर धमक्या मिळत होत्या. त्यानंतर दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीत तिच्या वकिलाचा आणि सरकारी वकिलाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने म्हटले की याचिकाकर्त्याची संरक्षणाची विनंती प्रथमदर्शनी न्याय्य वाटते. एर्नाकुलम सेंट्रल पोलीस स्टेशनने तरुणीला पुरेशी सुरक्षा पुरवावी. या महिन्याच्या सुरुवातीला उच्च न्यायालयाच्या दुसऱ्या खंडपीठाने अपहरणप्रकरणी तिचा पती मोहम्मद फरमान याला एक महिन्याचा ट्रान्झिट जामीन मंजूर केला.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# ढाक्यात हिंदूंचा एल्गार! हजारोंचा मोर्चा

■ ढाका

**बांगलादेशातील** रंगपूर विभागात उभारण्यात येत असलेल्या प्रभू राम यांच्या भव्य पुतळ्याचे बांधकाम थांबवण्यात आल्याच्या निषेधार्थ हजारो हिंदूंनी राजधानी ढाका मोठे आंदोलन केले. 'जय श्रीराम'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला असून, प्रभू राम यांच्या प्रतिमेचा अपमान करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली.

गायबांधा जिल्ह्यातील पलाशबारी येथे प्रभू राम यांचा ८१ फूट उंच पुतळा उभारण्याचे काम सुरू होते. मात्र काही इस्लामी संघटनांच्या विरोधानंतर आणि धमक्यांमुळे हे काम थांबवण्यात आल्याचा दावा मंदिर समितीने केला आहे. या निर्णयानंतर हिंदू समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.या पार्श्वभूमीवर विविध हिंदू संघटना, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्ते ढाक्यातील शाहबाग चौकात एकत्र आले. तेथून त्यांनी नॅशनल प्रेस क्लबपर्यंत मोर्चा काढत सरकारविरोधात घोषणाबाजी केली. हिंदू महाजोत या संघटनेच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी मानवी साखळी तयार करून निषेधही व्यक्त केला.आंदोलकांनी दोषींना अटक करण्यासाठी सरकारला ७२ तासांचा अल्टिमेटम दिला असून मागणी मान्य न झाल्यास देशव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# भारतीय वंशाच्या तरुणाकडून आई-वडील, आजीची हत्या

■ टेक्सास

**अमेरिकेतील** टेक्सास राज्यात भारतीय वंशाच्या १९ वर्षीय तरुणाने त्याच्या कुटुंबीयांवर गोळीबार करून आई-वडील आणि आजीची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पोलिसांनी नाट्यमयरित्या पाठलाग केल्यानंतर आरोपीला अटक केली.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीने त्याचे वडील स्वीरा राम (५६), आई कमलेश राणी (४६) आणि आजी मिंदर कौर (७३) यांच्यावर गोळीबार केला. त्याने आपल्या भावावरही गोळ्या झाडल्या; मात्र तो सुदैवाने बचावला आणि तातडीने ९११ आपत्कालीन सेवेला फोन करून घटनेची माहिती पोलिसांना दिली. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांना दोन जण मृतावस्थेत आढळले, तर गंभीर जखमी झालेल्या स्वीरा राम यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# पाकिस्तानच्या बन्नू जिल्ह्यात दोन स्फोट! सात जण ठार



■ बन्नू

**पाकिस्तानच्या** बन्नू जिल्ह्यात एकापाठोपाठ झालेल्या दोन रिमोट-कंट्रोल बॉम्बस्फोटांत ७ जण ठार झाले. पहिला हल्ला एका प्रवासी वाहनाला लक्ष्य करून करण्यात आला, तर जखमींना रुग्णालयात नेत असताना दुसरा स्फोट झाला. या घटनेचा राष्ट्राध्यक्ष आसिफ अली झरदारी आणि पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी निषेध केला.

बन्नू जिल्ह्यातील फांग मुसा खेल परिसरात प्रवाशांना घेऊन जाणारे खाजगी वाहन डोमेलच्या दिशेने जात असताना त्यावर रिमोट-कंट्रोल बॉम्बने हल्ला करण्यात आला. स्फोट इतका शक्तिशाली होता की वाहन पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. स्थानिकांनी तात्काळ बचावकार्य सुरू केले आणि जखमींना रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला. पहिल्या हल्ल्यातील जखमींना रुग्णालयात नेले जात असतानाचएक किलोमीटर अंतरावर दुसरा स्फोट झाला. या हल्ल्यातही एका वाहनाला लक्ष्य करण्यात आले होते. दुसऱ्या स्फोटात दोन जणांचा मृत्यू झाला आणि वाहन पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. या दोन लागोपाठच्या स्फोटांमुळे परिसरात घबराट पसरली. पोलिसांनी याला रिमोट-कंट्रोल दहशतवादी हल्ला म्हटले. या घटनेनंतर सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसर सील केला असून शोधमोहीम सुरू केली आहे.

# पंढरपूरचे विठ्ठल मंदिर २ दिवस बंद

■ पंढरपूर

**पंढरपूरात** श्री विठ्ठल मंदिराचे सर्व प्रकारचे दर्शन २३ आणि २४ जून रोजी मूर्ती संवर्धनासाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती मंदिर प्रशासनाने दिली आहे. या दोन दिवसांत भाविकांनी पंढरपूरला येऊ नये, असे आवाहनही करण्यात आले आहे. मात्र, मूर्ती संवर्धन नेमके कशा प्रकारे करायचे, याबाबतचा निर्णय उद्या घेण्यात येणार आहे.

# मुंबईत ३० टक्के पाणीकपात? ९ टक्केच पाणीसाठा शिल्लक

■ मुंबई



**मुंबईला** पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांमधील पाणीसाठा झपाट्याने घटत असून सध्या केवळ ९ टक्केच पाणी शिल्लक राहिले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत पाऊस झाला नाही, तर मुंबईकरांवर २५ ते ३० टक्के पाणीकपातीची वेळ येऊ शकते, अशी भीती पालिकेच्या जल अभियंता विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

दरवर्षी जूनच्या सुरुवातीला तलावांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची सुरुवात होते. मात्र यंदा २० जून उलटूनही पावसाचा नसल्याने पाणीसाठ्यात मोठी घट झाली आहे. नाशिकमधील अप्पर वैतरणा तलाव आधीच आटला असून तानसा तलावही पुढील चार ते पाच दिवसांत कोरडा पडण्याची शक्यता आहे. सध्या तानसा तलावात अवघा ३ टक्के (सुमारे ५ हजार दशलक्ष लिटर) पाणीसाठा उरला आहे. मुंबईला सर्वाधिक पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा तलावातही केवळ ८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे, तर मध्य वैतरणा तलावात १० टक्केच पाणी उरले आहे. विहार तलावात ४१ टक्के साठा दिसत असला, तरी त्याची एकूण क्षमता कमी असल्याने प्रत्यक्षात केवळ ११,४४८ दशलक्ष लिटर पाणी उपलब्ध आहे. तुळशी तलावातही २२ टक्के साठा असून सुमारे १,७९२ दशलक्ष लिटर पाणी उरले आहे. सध्या सहा तलावांमध्ये मिळून सुमारे १.३० लाख दशलक्ष लिटर पाणीसाठा उपलब्ध असून तो केवळ २० ते २५ दिवस पुरेल, असा अंदाज आहे.

# आजचे राशी भविष्य

**सोमवार ता. २२ जून २०२६**
ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| | |
|---|---|
| मेष | वास्तुसंबंधित कामांमध्ये सफलता मिळेल. बोलताना संयम ठेवा. आर्थिक लाभ होतील. |
| वृषभ | संततीबाबत सुवार्ता समजतील. आनंदी राहाल. सामाजिक समस्या दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहाल. |
| मिथुन | कामानिमित्त प्रवास घडण्याची शक्यता राहील. भावंडांचे सहकार्य लाभेल. पोटाच्या समस्या उद्भवू शकतात. खाण्याची पथ्ये सांभाळावीत. |
| कर्क | नोकरीमध्ये कामाची दखल घेतली जाईल. वरिष्ठ खुश होतील. घरात आनंदी वातावरण राहील. |
| सिंह | नवीन आर्थिक गुंतवणूक करण्याचे योजाल. आर्थिक लाभाचे चांगला झाला तरी खर्चही वाढणार आहे. |
| कन्या | कन्या रास : आनंदाने आणि मजेने दिवस व्यतीत कराल. सहकाऱ्यांची साथ लाभेल. विवाहोत्सुक व्यक्तींना अनुकूलता राहील. |
| तूळ | नवीन ओळखी वाढतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखण्यात यश मिळेल. |
| वृश्चिक | नियोजित कामांमध्ये सफलता मिळेल. प्रवास फायदेशीर ठरतील. जोडीदाराचे सहकार्य लाभेल. |
| धनु | जनसंपर्क वाढेल. नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळेल. संततीशी सुसंवाद साधा. |
| मकर | समारंभात सहभागी व्हाल. वैवाहिक जीवन सुखद राहील. विवाहाचे प्रस्ताव येतील. |
| कुंभ | महत्त्वाच्या कामांमध्ये अचानक अडचणी येण्याची शक्यता. मानसिक ताण वाढू देऊ नका. चुकीच्या गोष्टी घडणार नाही याची काळजी घ्या. |
| मीन | नोकरीमध्ये तुमचे वर्चस्व निर्माण कराल. आर्थिक लाभ होतील. व्यावसायिक गुंतवणूक तूर्तास पुढे ढकलावी. |

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 25 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 21/06/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- **GL-03 : 7558**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0809 | 3171 | 5035 | 5036 | 5847 | 6635 | 8022 | 8816 | 9627 | 9676 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0387 | 1381 | 2291 | 4034 | 4074 | 6727 | 6857 | 8356 | 9221 | 9773 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0403 | 3043 | 3356 | 4011 | 5537 | 6386 | 6912 | 6923 | 8085 | 8329 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0980 | 1783 | 3894 | 5372 | 5794 | 6271 | 7406 | 8031 | 8812 | 9565 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1658 | 2571 | 3247 | 4119 | 4846 | 5860 | 6733 | 7513 | 8408 | 9484 |
| | | 1805 | 2578 | 3293 | 4124 | 4991 | 5935 | 6775 | 7558 | 8495 | 9555 |
| 0028 | 1134 | 1912 | 2622 | 3301 | 4144 | 5028 | 5958 | 6776 | 7702 | 8502 | 9629 |
| 0040 | 1172 | 1950 | 2625 | 3333 | 4221 | 5059 | 5973 | 6777 | 7707 | 8528 | 9631 |
| 0041 | 1174 | 1993 | 2629 | 3365 | 4258 | 5235 | 5993 | 6881 | 7720 | 8584 | 9639 |
| 0078 | 1181 | 2069 | 2642 | 3415 | 4264 | 5255 | 6101 | 6907 | 7753 | 8587 | 9656 |
| 0085 | 1193 | 2080 | 2662 | 3429 | 4270 | 5315 | 6124 | 6910 | 7782 | 8724 | 9683 |
| 0092 | 1195 | 2114 | 2722 | 3512 | 4326 | 5348 | 6129 | 6960 | 7786 | 8799 | 9691 |
| 0277 | 1221 | 2118 | 2740 | 3582 | 4342 | 5380 | 6163 | 6964 | 7787 | 8802 | 9693 |
| 0391 | 1224 | 2164 | 2864 | 3593 | 4414 | 5461 | 6186 | 6982 | 7798 | 8804 | 9703 |
| 0401 | 1235 | 2221 | 2872 | 3631 | 4418 | 5485 | 6206 | 6991 | 7806 | 8831 | 9704 |
| 0408 | 1301 | 2229 | 2923 | 3645 | 4422 | 5524 | 6219 | 7012 | 7850 | 8865 | 9731 |
| 0590 | 1316 | 2233 | 2931 | 3647 | 4428 | 5538 | 6275 | 7065 | 7901 | 8869 | 9733 |
| 0717 | 1340 | 2256 | 2944 | 3663 | 4434 | 5542 | 6278 | 7067 | 7975 | 8871 | 9770 |
| 0764 | 1381 | 2277 | 2976 | 3778 | 4438 | 5547 | 6364 | 7137 | 8189 | 8875 | 9795 |
| 0794 | 1420 | 2281 | 3003 | 3872 | 4451 | 5550 | 6383 | 7157 | 8216 | 8909 | 9848 |
| 0832 | 1461 | 2347 | 3028 | 3977 | 4475 | 5555 | 6426 | 7171 | 8255 | 9087 | 9870 |
| 0908 | 1503 | 2359 | 3084 | 3980 | 4645 | 5596 | 6435 | 7176 | 8284 | 9094 | 9899 |
| 0936 | 1570 | 2461 | 3131 | 4043 | 4664 | 5598 | 6614 | 7219 | 8326 | 9099 | 9947 |
| 1028 | 1572 | 2472 | 3135 | 4065 | 4667 | 5781 | 6648 | 7373 | 8365 | 9386 | 9950 |
| 1079 | 1581 | 2516 | 3139 | 4066 | 4741 | 5835 | 6650 | 7443 | 8384 | 9418 | 9969 |
| 1120 | 1614 | 2531 | 3183 | 4080 | 4828 | 5846 | 6699 | 7471 | 8389 | 9482 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 25 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 21/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- **MG-08 : 8625** — श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- **6631** — ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

तिसरे बक्षिस रु. 2000/- **7759** — ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0748 | 2699 | 2792 | 3219 | 4611 | 4827 | 6308 | 6507 | 7230 | 8926 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0427 | 0568 | 1372 | 2353 | 2654 | 4196 | 5005 | 6281 | 8085 | 9500 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0766 | 1726 | 2448 | 4557 | 5922 | 6800 | 7129 | 8890 | 9036 | 9536 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1512 | 2371 | 3086 | 4012 | 4574 | 5288 | 6234 | 7007 | 8378 |
| | | 1695 | 2421 | 3142 | 4077 | 4643 | 5375 | 6303 | 7187 | 8385 |
| | | 1726 | 2517 | 3243 | 4136 | 4704 | 5408 | 6326 | 7307 | 8405 |
| 0000 | 0930 | 1731 | 2557 | 3252 | 4146 | 4739 | 5414 | 6361 | 7345 | 8486 |
| 0006 | 0971 | 1780 | 2589 | 3264 | 4177 | 4754 | 5448 | 6371 | 7411 | 8518 |
| 0036 | 1003 | 1796 | 2617 | 3317 | 4191 | 4761 | 5516 | 6400 | 7514 | 8533 |
| 0100 | 1013 | 1829 | 2705 | 3323 | 4246 | 4781 | 5525 | 6469 | 7515 | 8544 |
| 0125 | 1053 | 1845 | 2708 | 3363 | 4285 | 4824 | 5526 | 6499 | 7518 | 8618 |
| 0150 | 1105 | 1874 | 2722 | 3378 | 4324 | 4936 | 5682 | 6631 | 7557 | 8833 |
| 0250 | 1106 | 1886 | 2732 | 3386 | 4342 | 4954 | 5684 | 6646 | 7572 | 8876 |
| 0306 | 1108 | 1948 | 2737 | 3423 | 4347 | 4962 | 5750 | 6655 | 7606 | 8918 |
| 0409 | 1109 | 2008 | 2810 | 3435 | 4354 | 4964 | 5753 | 6676 | 7670 | 9099 |
| 0447 | 1112 | 2032 | 2825 | 3437 | 4404 | 4971 | 5754 | 6697 | 7675 | 9124 |
| 0466 | 1145 | 2107 | 2834 | 3438 | 4435 | 4986 | 5853 | 6712 | 7707 | 9189 |
| 0467 | 1198 | 2137 | 2850 | 3517 | 4445 | 4990 | 5856 | 6767 | 8024 | 9238 |
| 0555 | 1201 | 2200 | 2883 | 3629 | 4468 | 5106 | 5946 | 6875 | 8068 | 9245 |
| 0619 | 1224 | 2215 | 2932 | 3717 | 4475 | 5115 | 5968 | 6887 | 8081 | 9421 |
| 0627 | 1317 | 2238 | 2936 | 3878 | 4495 | 5151 | 6022 | 6898 | 8087 | 9482 |
| 0804 | 1407 | 2243 | 3013 | 3933 | 4522 | 5154 | 6025 | 6926 | 8202 | 9623 |
| 0830 | 1429 | 2322 | 3031 | 3934 | 4527 | 5234 | 6179 | 6937 | 8333 | 9890 |
| 0870 | 1503 | 2335 | 3042 | 3942 | 4545 | 5253 | 6229 | 6982 | 8348 | 9972 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 25 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 21/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- **MO-08 : 7861**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0226 | 0946 | 1700 | 2800 | 2937 | 3061 | 3588 | 6731 | 7841 | 8228 (कोमल एजन्सी, औरंगाबाद) |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0786 | 3753 | 4181 | 4523 | 5265 | 7488 | 7803 | 7910 | 8065 | 8308 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0610 | 1331 | 1596 | 1882 | 4348 | 5228 | 5300 | 5769 | 6362 | 9163 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0490 | 1648 | 2601 | 4051 | 5305 | 6563 | 7719 | 8828 |
| | 0491 | 1718 | 2672 | 4056 | 5322 | 6578 | 7775 | 8995 |
| 0000 | 0635 | 1881 | 2699 | 4194 | 5330 | 6634 | 8061 | 9181 |
| 0001 | 0705 | 1951 | 3034 | 4402 | 5467 | 6762 | 8141 | 9247 |
| 0006 | 0928 | 1983 | 3065 | 4405 | 5535 | 6824 | 8145 | 9290 |
| 0019 | 1012 | 2018 | 3188 | 4486 | 5673 | 7017 | 8214 | 9466 |
| 0023 | 1091 | 2084 | 3335 | 4678 | 5845 | 7147 | 8258 | 9640 |
| 0035 | 1112 | 2109 | 3352 | 4774 | 5947 | 7216 | 8304 | 9729 |
| 0065 | 1132 | 2175 | 3362 | 4822 | 6194 | 7275 | 8446 | 9940 |
| 0130 | 1155 | 2298 | 3373 | 4864 | 6436 | 7380 | 8728 | 9946 |
| 0263 | 1445 | 2347 | 3436 | 5100 | 6470 | 7498 | 8807 | 9978 |
| 0305 | 1464 | 2427 | 3632 | 5116 | 6512 | 7592 | 8808 | 9990 |
| 0480 | 1631 | 2429 | 4010 | 5217 | 6562 | 7626 | 8811 | 9991 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. २२/६/२०२६

| | | |
|---|---|---|
| ७ | ० | ५ |
| ७३ | ०३ | ५३ |
| ७८ | ०८ | ५८ |
| १२४ | १३६ | १६९ |
| ३६८ | २८० | ३५७ |

# शाळा सुरू झाल्यानंतर आता दफ्तर वाटपाची घाई

■ मुंबई

**पालिका ४६ कोटी ४५ लाख खर्च करणार**

**१५ जून** रोजी मुंबईतील सरकारी व खासगी शाळा सुरू झाल्या आहेत. परंतु शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येईल, हा पालिका प्रशासन व भाजप महायुतीचा दावा फोल ठरला आहे.आता शाळा सुरू झाल्यानंतर पालिकेने दफ्तर वाटप करण्याची घाई सुरू केली आहे. त्यासाठी मुंबई महापालिका ४६ कोटी ४१ हजार रुपये खर्च करणार आहे. बुधवारी स्थायी समिती बैठकीत हा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर केला जाणार आहे.

दफ्तर वाटपासाठी स्थायी समितीत सादर होणार्या प्रस्तावावरुन खडाजंगी होण्याची शक्यता आहे.शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना २७ शालेय वस्तूंचे वाटप करण्यात येईल, असा दावा पालिका प्रशासन व भाजप महायुतीने केला.मात्र,पहिल्या दिवशी २७ पैकी फक्त १० टक्के फक्त वस्तूंचे वाटप झाले. त्यात आता विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात येणार आहे.

# सिंदखेडराजा ते पाचाड २५ जूनपासून पदयात्रा

■ फलटण

**व्यसनमुक्त** युवक संघातर्फे आयोजित करण्यात आलेली सिंदखेडराजा ते पाचाड ही पदयात्रा २५ जून ते ९ जुलै अशी १४ दिवस चालणार आहे. ह.भ.प. बंडातात्या कराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम निघत असून, दररोज सुमारे ३५ किमी अंतर पार केले जाणार आहे. ही पायी मोहीम राष्ट्रमाता जिजाऊंच्या पुण्यतिथी दिवशी त्यांच्या रायगड जिल्ह्यातील पाचाड येथील समाधीस्थळावर पोहोचेल. २५ जून रोजी सुरू होत असलेल्या या पदयात्रेत सातारा, सांगली, सोलापूर, पुणे, अहिल्यानगर, नाशिक आदी जिल्ह्यांतील व्यसनमुक्त युवक सहभागी होणार आहेत. सिंदखेडराजा, जालना, गाडे जळगाव, छावणी संभाजीनगर, गणेशवाडी, कांगोणी फाटा, अहिल्यानगर, सुपे, रांजणगाव, वाघोली, गोहे, वेल्हे, मढेघाट, वाकी मार्गे पाचाड असा यात्रेचा मार्ग निश्चित करण्यात आला.

# कर्नाटक मुख्यमंत्री शिवकुमारांची उद्धव ठाकरेंशी मातोश्रीवर भेट

■ मुंबई

**कर्नाटकचे** मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी मुंबईतील मातोश्री निवासस्थानी उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांच्यात सुमारे अर्धा तास बंद दाराआड चर्चा झाली असून, त्याला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.



कर्नाटक विधान परिषद निवडणुकीत भाजपाला फोडाफोडीच्या खेळात मात देत काँग्रेसला यश मिळवून देण्यात शिवकुमार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. महाराष्ट्रात शिवसेना आणि इतर पक्षांतील संभाव्य घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ही भेट अधिकच चर्चेत आली आहे. 'मातोश्री'वर पोहोचताच ठाकरे कुटुंबियांनी शिवकुमार यांचे शाल देऊन स्वागत केले. यावेळी उबाठाचे खासदार संजय राऊत देखील उपस्थित होते. दोन्ही नेत्यांमध्ये राज्यातील आणि राष्ट्रीय पातळीवरील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर चर्चा झाल्याची माहिती आहे. या भेटीनंतर शिवकुमार हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या कन्या रेवती यांच्या विवाह सोहळ्यासाठी रवाना झाले.

# पुणे-बंगळुरू महामार्गावर अपघातात २ ठार! ५ जखमी

■ सातारा

**पुणे-बंगळुरू** राष्ट्रीय महामार्गावरील डी-मार्टसमोरील परिसरात आज पहाटे झालेल्या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. कोल्हापूरहून जेजुरीकडे निघालेल्या टेम्पो ट्रॅव्हलरने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. अपघातानंतर झालेल्या मोठ्या आवाजाने परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. स्थानिक नागरिक आणि बचाव पथकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत जखमींना वाहनातून बाहेर काढले व उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. धडकेची तीव्रता इतकी मोठी होती की, टेम्पो ट्रॅव्हलरच्या पुढील भागाचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. अपघाताच्या वेळी वाहनातील बहुतांश प्रवासी झोपेत होते. या दुर्घटनेत स्नेहल उत्तम कांबळे आणि एकनाथ (बापू) कांबळे यांचा जागीच मृत्यू झाला.

# सावंतवाडीचे सर्व नगरसेवक जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर

**दोन दिवसीय प्रशिक्षण सत्राचे आयोजन**

■ सावंतवाडी

**सावंतवाडीचे** सत्ताधारी व विरोधी नगरसेवक जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर येथे विशेष अभ्यास दौऱ्यावर गेले आहेत. नागरी सेवा, मूलभूत सुविधा वितरण आणि महाराष्ट्र नगरपालिका अधिनियमाच्या तरतुदींविषयी माहिती घेण्याकरिता या दोन दिवसीय प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने पालिकेतील नगराध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व समित्यांचे सभापती व नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी श्रीनगर जम्मू आणि काश्मीर येथे दोन दिवसांचे प्रशिक्षण सत्र आयोजित केले आहे. या प्रशिक्षण सत्रात नागरी सेवा सुविधा वितरण व लोकप्रतिनिधींच्या जबाबदाऱ्या, अधिनियमातील तरतुदी, सभाशास्त्र, घनकचरा व्यवस्थापन या विषयांचे संपूर्ण माहिती दिली जात आहे. नगराध्यक्षा युवराज्ञी श्रद्धाराजे भोसले यांनी याबाबतची माहिती दिली असून, प्रशिक्षण सत्रांत अनुभवी व्याख्याते मार्गदर्शन करणार आहेत. या दौऱ्यात आरोग्य सभापती सुधीर आडीवरेकर, नियोजन सभापती आनंद नेवगी, पाणी पुरवठा सभापती प्रतीक बांदेकर, महिला व बालकल्याण सभापती दिपाली भालेकर, गटनेते खेमराज उर्फ बाबू कुडतरकर, नगरसेविका शर्वरी धारगळकर, सुनिता पेडणेकर, दुलारी रांगणेकर, निलम नाईक, ॲड. सायली दुभाषी, सुकन्या टोपले, स्नेहा नाईक, भाजपाचे दिलीप भालेकर आदी सहभागी झाले आहेत.

# भाईंदरचा तो वादग्रस्त पूल वाहतुकीसाठी खुला

■ भाईंदर

**'बॉटल नेक'** रचनेमुळे चर्चेत आलेल्या भाईंदरमधील उड्डाणपुलाचे आज अचानक उद्घाटन करून हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. एमएमआरडीएने भाईंदरमध्ये मेट्रो मार्गालगत उड्डाणपूल तयार केला आहे. चार मार्गिकेचा उड्डाणपूल भाईंदर फाटकाच्या दिशेने उतरताना निमुळता करून दोन मार्गिकेचा करण्यात आला आहे. या 'बॉटल नेक' रचनेवर समाजमाध्यमावर जोरदार टीका करण्यात येत होती. त्यामुळे वाहतूक कोंडी बरोबर अपघाताचा धोका वर्तविण्यात येत होता. परंतु मुख्यमंत्र्यांनी हा पूल सुरक्षित असल्याची ग्वाही दिली होती. आज सकाळी आमदार नरेंद्र मेहता यांच्या उपस्थितीत हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.



# संत गजानन महाराजांची पालखी पंढरपूरकडे रवाना

■ बुलडाणा

**विदर्भाची** पंढरी म्हणून ओळख असलेल्या शेगाव येथून श्री संत गजानन महाराजांची पालखी आज सकाळी टाळ-मृदुंगाच्या गजरात पंढरपूरकडे मार्गस्थ झाली. यंदा या पायीवारीचे ५७ वे वर्षे असून, ७०० हून अधिक वारकरी भगव्या पताका घेऊन या सोहळ्यात सहभागी झाले आहेत.

'गण गण गणात बोते'च्या जयघोषात निघालेली ही पालखी तब्बल ७५० किलोमीटरचा प्रवास ३३ दिवसांत पूर्ण करून २३ जुलै रोजी पंढरपूरमध्ये दाखल होणार आहे. आषाढी एकादशीच्या सोहळ्यात सहभागी झाल्यानंतर २८ जुलैपर्यंत पालखीचा पंढरपुरात मुक्काम राहणार असून, त्यानंतर परतीचा प्रवास सुरू होणार आहे. पालखी प्रस्थानानिमित्त शेगावमध्ये लाखो भाविकांनी गर्दी केली होती. दरम्यान, संत तुकाराम महाराजांच्या ३४१ व्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान ७ जुलै रोजी देहू येथून होणार असून, त्यासाठी जय्यत तयारी सुरू आहे.

# २५ वर्षीय तरुण दरीत पडला २ तासांच्या प्रयत्नांनंतर सुटका

■ पुणे

**राजगड** किल्ल्यावर फिरण्यासाठी आलेला २५ वर्षीय अविनाश श्रावण बागुल हा पर्यटक सुमारे ४० ते ५० फूट खोल दरीत कोसळला. सुदैवाने दरीतील एका मोठ्या झाडाला तो अडकल्याने दुर्घटना टळली. या अपघातात अविनाश गंभीर जखमी झाला असून, आपत्ती व्यवस्थापन विभागाने तब्बल दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर त्याची सुखरूप सुटका केली. अविनाश श्रावण बागुल हा आपल्या कुटुंबियांसह राजगड किल्ला पाहण्यासाठी आला होता. बालेकिल्ल्याकडे जात असताना मुख्य मार्ग सोडून तो दुसऱ्या वाटेने गेला.

# पावसाने दडी मारल्याने गोव्यात मासेमारी उठवा

**मच्छिमारांची मागणी**

■ पणजी

**पावसाळा** लांबल्यामुळे गोव्यातील पारंपरिक मच्छिमारांनी मासेमारी बंदी उठवण्याची मागणी केली आहे. मासेमारी बंदीचा हा ६१ दिवसांचा काळ १ जून ते ३१ जुलै दरम्यान असतो. मात्र, पाऊस वेळेवर न आल्यामुळे आणि आर्थिक संकटांमुळे मच्छिमारांनी ही मागणी लावून धरली आहे. मच्छीमार व्यावसायिकांनी मच्छीमार खात्याकडे मासेमारी बंदीचा कालावधी पुढे ढकलण्याची मागणी केली आहे.किमान पावसाळ्याची प्रत्यक्ष सुरुवात झाल्या-नंतरच बंदी लागू करावी, जेणेकरून मासळीच्या प्रजनन प्रक्रियेला योग्य कालावधी मिळेल आणि मच्छीमारांनाही आर्थिक दिलासा मिळेल, अशी त्यांची भूमिका आहे.



# काँग्रेसचे माधवराव पाटील भाजपाच्या वाटेवर?

■ नांदेड

**काँग्रेसचे** माजी आमदार माधवराव पाटील-जवळगावकर यांच्या एका वक्तव्यामुळे नांदेड जिल्ह्यातील हदगाव विधानसभा मतदारसंघात मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते म्हणून ओळख असलेले जवळगावकर त्यांच्या या वक्तव्यामुळे भाजपाच्या वाटेवर असल्याच्या चर्चांना वेग आला आहे.

एका जाहीर सभेत कार्यकर्त्यांशी संवाद साधताना माधवराव-पाटील जवळगावकर यांनी काँग्रेसमध्ये राहिल्याबद्दल उघडपणे खंत व्यक्त केली. ते म्हणाले की, अशोक चव्हाण यांच्यासोबत भाजपात गेलो असतो, तर आज आमदार असतो. मात्र त्यावेळी मी काँग्रेसचा विद्यमान आमदार असल्याने पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला नाही. त्यांच्या या वक्तव्यामुळे हदगावसह जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना जोर आला आहे. आगामी काळात ते भाजपामध्ये प्रवेश करणार का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. आपल्या पुढील राजकीय वाटचालीचा निर्णय त्यांनी कार्यकर्त्यांवर सोपवला आहे. यासाठी २६ जून रोजी हदगाव येथे महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेतल्यानंतरच पुढील भूमिका जाहीर केली जाणार आहे.

# पावसाळी अधिवेशनासाठी छापील पास बंद! चेहरा पडताळणीने प्रवेश

■ मुंबई

**महाराष्ट्र** विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरू होत आहे. यंदा प्रवेश व्यवस्थेत मोठा बदल करण्यात आला आहे. प्रथमच विधानभवनात प्रवेशासाठी छापील पास पूर्णपणे बंद करण्यात आले असून, सर्वांसाठी 'चेहरा पडताळणी पद्धती' (फेस रेकग्निशन) लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे याबाबत माहिती देण्यात आली आहे. यंदाच्या अधिवेशनात माननीय पीठासीन अधिकारी, मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ सदस्य, अधिकारी-कर्मचारी, स्वीय सहायक तसेच अभ्यागत सर्वांसाठी ई-प्रवेश प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे. या नव्या प्रणालीअंतर्गत प्रत्येक व्यक्तीची नोंदणी डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे.



गोदरेज इंटरप्राईजेस, पी. ई. एस विभागमधील कामगार रवी देशमुख यांना महाराष्ट्र शासन पुरस्कृत विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार सन २०२४ करिता निवड झाली.

# राज्यपालांच्या हस्ते रायगड जिल्ह्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्कुलबस

■ रायगड

**सुमन** रमेश तुलसियानी ट्रस्टतर्फे रायगड जिल्ह्यातील रातवड येथील छत्रपती शिक्षण मंडळाच्या माध्यमिक विद्यामंदिराला स्कुलबस देण्यात आली आहे. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते ही स्कुलबस लोकभवन येथे शिक्षण संस्थेला विधिवत देण्यात आली.

कार्यक्रमाला सुमन रमेश तुलसियानी ट्रस्टचे विश्वस्त मनीष रुपाणी, नाना पालकर स्मृती समितीचे पदाधिकारी रायगड भूषण कृष्णा महाडिक, छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याणचे मानद सचिव डॉ निलेश रेवगडे, तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील रातवड येथील शाळा आठ गावांमधील तसेच ४ आदिवासी पाड्यांमधील १९६ मुलामुलींना शिक्षण देत असून स्कुलबस सेवेमुळे शाळेतील पटसंख्या ४२ विद्यार्थ्यांनी वाढली असल्याचे सांगण्यात आले. सुमन रमेश तुलसियानी ट्रस्टतर्फे आजवर ९ स्कुलबस देण्यात आल्या असल्याचे यावेळी सांगण्यात आले. रमेश तुलसियानी व सुमन तुलसियानी यांचे १५ दिवसांच्या अंतरानी अलीकडेच निधन झाले. परंतु त्यांच्या ट्रस्टतर्फे आजही सेवाकार्य सुरु असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# वझर सखल धबधब्यातील मृतदेह तीन दिवसांनी बाहेर

■ दोडामार्ग

**तालुक्यातील** विर्डी येथील वझर सखल धबधब्याच्या खोल जलकुंडात गुरुवारी बुडून बेपत्ता झालेल्या कर्नाटकातील धरवाड येथील युवकाचा मृतदेह अखेर काल शनिवारी तिसऱ्या दिवशी बाहेर काढण्यात आला. सह्याद्री डव्हेंचर आणि रेस्क्यू टीमने सलग तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर विजय दोडमणी (२३) याचा मृतदेह खोल डोहातून बाहेर काढला.

गुरुवारी दुपारी अंघोळ करत असताना विजय दोडमणी हा युवक अचानक खोल जलकुंडात गेला आणि पाण्यात बुडून बेपत्ता झाला. त्यानंतर स्थानिकांनी आणि प्रशासनाने शोधमोहीम सुरू केली; मात्र सुरुवातीला त्याचा ठावठिकाणा लागला नव्हता.अखेर सिंधुदुर्गातील सह्याद्री डव्हेंचर आणि रेस्क्यू टीमने ड्रोन कॅमेऱ्याच्या सहाय्याने शोधकार्य सुरू केले. त्यादिवशी अंधार पडल्याने शोधकार्य थांबवले. त्यानंतर काल शनिवारी ९.३० वाजता रेस्क्यू ऑपरेशन पुन्हा सुरू करण्यात आले.

# १० खोट्या केस करणाऱ्या महिलेला हायकोर्टाचा दणका

■ मुंबई



**कायद्याचा** गैरवापर करून वैयक्तिक फायद्यासाठी खोट्या केसेस दाखल करणे हा कायदेशीर प्रक्रियेचा स्पष्ट गैरअपव्यय आहे, असे निरिक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले आणि १० खोट्या केसेस दाखल करणाऱ्या महिलेला मोठा दणका दिला. हा निर्णय देतानाच न्यायालयाने टूर मॅनेजरविरुद्ध दाखल झालेली बलात्काराचा एफआयआर रद्द केला. संबंधित तक्रारदार महिलेच्या संपूर्ण भूतकाळाचा विचार करून पोलिसांना तिने भविष्यात केलेल्या तक्रारींवर थेट गुन्हा नोंदवण्यापूर्वी सक्तीने प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश दिले.

महिलेच्या तक्रारीवरुन मुंबईतील सहार पोलीस ठाण्यात दाखल झालेला गुन्हा रद्द करण्याची विनंती करीत मनोज धनवडे यांनी न्यायालयात मागितली होती. त्यांच्यावतीने ॲड. अर्जुन कदम यांनी याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या एकलपीठाने सविस्तर सुनावणी घेतली आणि याचिकाकर्त्याविरुद्धचा बलात्काराचा गुन्हा रद्द केला. तक्रारदार महिला ही स्टेट बँक ऑफ इंडियाच्या होम लोन विभागात कार्यरत आहे. तिने २०१९ मध्ये मलेशिया आणि सिंगापूरच्या टूरदरम्यान टूर मॅनेजर असलेल्या मनोज धनवडे यांच्याशी मैत्री केली. मनोज यांनी लग्नाचे आमिष दाखवून सिंगापूरमधील हॉटेलमध्ये तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप महिलेने केला होता. तथापि, हा आरोप खोटा असल्याचे कालांतराने निष्पन्न झाले. तक्रारदार महिलेने २०११ पासून वेगवेगळ्या व्यक्तींवर एकूण १० गुन्हे दाखल केले आहेत. तिने यापूर्वी वेगवेगळ्या पुरुषांवर लग्नाचे खोटे आमिष दाखवून बलात्कार केल्याच्या किमान चार केसेस वेगवेगळ्या राज्यांत दाखल केल्या. त्यात आरोपींची निर्दोष मुक्तता झाली आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेत न्यायालयाने याचिकाकर्त्याविरोधातील गुन्हा रद्द केला आणि तक्रारदार महिलेला दणका दिला. भविष्यात महिलेच्या तक्रारीवर थेट एफआयआर नोंदवू नये, आधी कायदेशीर चौकशी करावी, असे न्यायालयाने नमूद केले.

# कुंभवे कातळ-नवशी पाटी दरम्यान पुलावर कारचा भीषण अपघात

■ दापोली

**दापोली-खेड** मार्गावरील कुंभवे कातळ ते नवशी पाटी दरम्यान असलेल्या पुलावर काल पहाटे एका चारचाकी वाहनाचा भीषण अपघात झाला. वाहन पुलाच्या कठड्याला जोरदार धडकल्याने कारच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. मात्र, सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दापोली-खेड मार्गाचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असून पुलासह अनेक ठिकाणचे बांधकाम अद्याप अपूर्ण आहे. बांधकाम सुरू असलेल्या भागात वाहनचालकांना सावध करण्यासाठी आवश्यक दिशादर्शक फलक, धोक्याच्या सूचना किंवा काम सुरू असल्याचे बोर्ड बहुतांश ठिकाणी दिसत नाहीत. परिणामी वाहनचालकांची दिशाभूल होऊन अपघातांची संख्या वाढत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दापोली हे कोकणातील महत्त्वाचे पर्यटनस्थळ असल्याने वर्षभर हजारो पर्यटक या मार्गाने प्रवास करतात.

# लोकमान्य टिळक टर्मिनस स्थानकात ५६ तासांचा ब्लॉक

■ मुंबई

**मध्य** रेल्वे मार्गावरील लोकमान्य टिळक टर्मिनस येथे विविध पायाभूत सुविधांच्या कामांसाठी बुधवार २४ ते शुक्रवार २६ जूनदरम्यान ५६ तासांचा विशेष ट्रॅफिक ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे अनेक मेल आणि एक्स्प्रेस गाड्यांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे.

या विशेष ट्रॅफिक ब्लॉकमध्ये शंटिंग नेकचे बांधकाम, 'सिक साइडिंग'मध्ये बदल, देखभाल साइडिंग यार्ड, देखभाल साइडिंग क्र. ६, ७, ८ आणि ९ मधील 'पिट लाईन्स'चा विस्तार, तसेच पाणीपुरवठा वाहिनी, ड्रेनेज आणि पावसाळी पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिनीचे वळण बदलणे, ही कामे केली जातील. बुधवारी सकाळी ८ वाजेपासून ते शुक्रवारी दुपारी ४ वाजेपर्यंत हा ५६ तासांचा ब्लॉक घेतला जाईल.

**२४ जूनपासून विशेष ट्रॅफिक ब्लॉक सुरू**

या विशेष ब्लॉकमुळे मंगळुरू सेंट्रल-लोकमान्य टिळक टर्मिनस मत्स्यगंधा एक्स्प्रेस, चेन्नई-लोकमान्य टिळक टर्मिनस एक्स्प्रेस, तिरुवनंतपूरम-लोकमान्य टिळक टर्मिनस नेत्रावती एक्स्प्रेस, गोरखपूर-लोकमान्य टिळक टर्मिनस एक्स्प्रेस या गाड्यांची सेवा बुधवारी ठाणे स्थानकावरच समाप्त होईल. २४ जून रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून रात्री ११.३५ वाजता सुटणारी लोकमान्य टर्मिनस-पाटलीपुत्र एक्स्प्रेस २५ जूनला पहाटे वाजता सुटेल. २३ जून रोजी प्रवास सुरू करणाऱ्या गोरखपूर-लोकमान्य टिळक टर्मिनस कुशीनगर एक्स्प्रेस २४ जून रोजी प्रवास सुरू करणाऱ्या मंगळुरू सेंट्रल-लोकमान्य टिळक टर्मिनस मत्स्यगंधा एक्स्प्रेससह विविध एक्स्प्रेस गाड्यांची सेवा बुधवारी ठाणे स्थानकावरच समाप्त होईल.

# वणीमध्ये पिसाळलेल्या कुत्र्याचा ३३ जणांना चावा

■ नाशिक

**जिल्ह्यातील** वणी शहरात मागील दोन दिवसांपासून एका पिसाळलेल्या कुत्र्याने अक्षरशः हैदोस घातला आहे. आतापर्यंत या कुत्र्याने तब्बल ३३ जणांना चावा घेऊन जखमी केले आहे. या प्रकारामुळे या परिसरात कमालीचे भीतीचे वातावरण पसरले आहे. या पिसाळलेल्या कुत्र्याने शहरातील संखेश्वर नगर, संस्कृती नगर आणि कडगल्ली परिसरात २९ जणांना चावा घेतला. त्यानंतर कुत्र्याने साकी हॉटेल परिसर आणि दत्तनगर भागातही धुमाकूळ घालत आणखी चार पाच जणांना देश केला. रक्ताळलेल्या अवस्थेत एकापाठोपाठ एक नागरिक वणी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल होऊ लागल्याने, हा सर्व प्रकार एकाच कुत्र्यामुळे घडल्याचे लक्षात आले. पिसाळलेल्या कुत्र्याने लहान मुले, महिला आणि वृद्धांना टार्गेट केल्याने नागरिक घराबाहेर पडण्यासही घाबरत आहेत.

# शक्तिपीठ जमीन संपादनाविरोधात ३० जूनपर्यंत हरकती नोंदवण्याची संधी

■ कोल्हापूर

**नागपूर-गोवा** शक्तिपीठ महामार्गासाठी आवश्यक जमिनी संपादित करण्याबाबत राज्य शासनाने अधिसूचना प्रसिद्ध केली असून, यामुळे जिल्ह्यातील जमीन संपादन प्रक्रियेला अधिकृतपणे सुरुवात झाली आहे. संपादनाविरोधात ३० जूनपर्यंत लेखी हरकती नोंदवण्याची अंतिम संधी देण्यात आली आहे. हा महामार्ग सार्वजनिक प्रयोजनासाठी अत्यावश्यक असल्याचे शासनाने अधिसूचनेत नमूद केले आहे. ज्या जमीनधारकांच्या हरकती यापूर्वी विचारात घेतलेल्या नाहीत किंवा ज्यांची अद्याप सुनावणी झालेली नाही, अशा बाधितांना अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० जूनपर्यंत लेखी हरकती नोंदवण्याची अंतिम संधी देण्यात आली आहे. हरकती व सूचना भूमी संपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, करवीर उपविभाग यांच्याकडे कारणांसह लेखी स्वरूपात सादर कराव्या लागणार आहेत. या निर्णयामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील शेतकरी आणि जमीनधारकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या महामार्गासाठी करवीर तालुक्यातील तब्बल ९४३ एकर जमीन संपादित करण्याचा प्रस्ताव शासनाने जाहीर केला आहे.

# ठाणे-पालघर जिल्हा बँक निवडणूक महायुतीतच रंगणार थेट सामना

■ ठाणे

**ठाणे-पालघर** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत महायुतीमध्ये उभी फूट पडली आहे. भाजपा आणि शिंदे शिवसेना एकत्र येऊन निवडणूक लढवण्याऐवजी दोन स्वतंत्र पॅनलमध्ये समोरासमोर उभे ठाकले आहेत. या निवडणुकीच्या निमित्ताने भाजपाचे माजी मंत्री कपिल पाटील आणि आमदार किसन कथोरे यांच्यातील अंतर्गत मतभेदही चव्हाट्यावर आले आहेत.

केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपा पुरस्कृत 'परिवर्तन पॅनल' मैदानात आहे. तर शिंदे शिवसेनेच्या पुढाकाराने आणि भाजपाचे काही स्थानिक नेते, हितेंद्र ठाकूर (बविआ) आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांनी एकत्र येत 'सहकार पॅनल'ची स्थापना केली आहे. या सहकार पॅनलला भाजपाचे आमदार किसन कथोरे यांनी साथ दिली आहे. बँकेच्या एकूण २१ संचालक पदांसाठी ही निवडणूक होत असून, यापैकी ९ संचालक आधीच बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित १२ जागांसाठी थेट महायुतीच्याच दोन गटांमध्ये म्हणजे परिवर्तन पॅनल विरुद्ध सहकार पॅनल अशी मोठी लढत रंगणार आहे. दरम्यान, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कथोरे हे भाजपाला मदत करतील.

# मोबाईल चोराचा पळताना हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

■ बंगळुरू

**मोबाईल** चोरी करून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका चोराचा रस्त्यातच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना बंगळुरू शहरात घडली.या घटनेत त्याच्या दुसऱ्या साथीदाराला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

बंगळुरूमधील कब्बनपेट येथील १४ व्या क्रॉस रोडवर एका पादचाऱ्याचा मोबाईल फोन हिसकावून दोन दुचाकीस्वार चोरटे पळून जाण्याचा प्रयत्न करत होते. मोबाईल चोरीला गेल्याचे लक्षात येताच पीडित व्यक्तीने आरडाओरडा करण्यास सुरुवात केली.त्यावेळी जवळच काम करणाऱ्या एका सतर्क कामगाराने चोरांना रोखण्यासाठी त्यांच्या दुचाकीच्या दिशेने एक पोते फेकले. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे चोरांच्या दुचाकीचा तोल गेला आणि ते खाली पडले. स्वतःला पकडले जाण्याच्या भीतीने त्यांनी चोरीचा मोबाईल तिथेच टाकला आणि दुचाकी सोडून पायीच पळ काढला.


# ब्रह्मोससज्ज आयएनएस दूनागिरीसह ३ स्वदेशी युद्धनौका नौदलात दाखल



■ कोलकाता

**भारतीय** नौदलाच्या सामर्थ्यात मोठी भर घालत ब्रह्मोस क्षेपणास्त्रांनी सज्ज असलेली अत्याधुनिक स्टील्थ फ्रिगेट आयएनएस दूनागिरी, अँटी-सबमरीन युद्धनौका आयएनएस अग्रय आणि सर्वेक्षण जहाज आयएनएस संशोधक यांचा कोलकाता येथील श्यामा प्रसाद मुखर्जी पोर्टवर औपचारिक समावेश झाला. स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित या तिन्ही युद्धनौकांमुळे भारतीय नौदलाची सागरी सुरक्षा, पाणबुडीविरोधी कारवाई आणि समुद्री सर्वेक्षण क्षमता अधिक मजबूत होणार आहे. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थित राहून आत्मनिर्भर भारताच्या संरक्षण क्षेत्रातील वाढत्या सामर्थ्याचा गौरव केला.

भारतीय नौदलाच्या वॉरशिप डिझाईन ब्युरोने या तिन्ही जहाजांचे डिझाईन तयार केले असून, कोलकाता येथील गार्डन रिच शिपबिल्डर्स अँड इंजिनियर्स या सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीने त्यांची निर्मिती केली आहे. आयएनएस दूनागिरी हे प्रोजेक्ट-१७ ए अंतर्गत तयार केलेले पाचवे स्टील्थ फ्रिगेट आहे. अत्याधुनिक युद्धतंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या या युद्धनौकेला ब्रह्मोस पृष्ठभाग-ते-पृष्ठभाग सुपरसोनिक क्षेपणास्त्र प्रणाली बसवली. याशिवाय जहाजावर हेलिकॉप्टर ऑपरेशन्सची सुविधा असून, विविध प्रकारच्या सागरी धोक्यांना तोंड देण्याची क्षमता आहे.




संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# पोस्टाच्या स्पीडवर नवे शिक्कामोर्तब

**भारतातील** पोस्ट व्यवस्था अत्यंत उत्तम स्वरूपाची आणि सामान्य माणसाला खूप मोठा दिलासा देणारी व्यवस्था म्हणता येते. अलीकडेच अनेक टीव्ही चॅनेल्सवर पोस्ट ऑफिसच्या स्पीड पोस्ट योजनेची रंगीत जाहिरात दाखवली गेली. पहिल्यांदाच पोस्ट ऑफिसची अशाप्रकारे जाहिरात केली गेलेली आहे. विशेष म्हणजे एका दिवसांमध्ये स्पीड पोस्ट डिलिव्हरी आपल्या घरापर्यंत पोहोचवण्याची हमी या जाहिरातीतून दाखवली गेली. पोस्ट ऑफिसच्या स्पीड पोस्ट योजनेने घेतलेली ही मोठी झेप म्हणता येईल. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये नेट, इंटरनेट, ई-मेल या सगळ्या गोष्टी इतक्या वेगाने पसरल्या आहेत की काय काही क्षणामध्ये तुम्हाला तुमचे मेसेजेस पाठवता येतात. ईमेलवरून पत्रव्यवहारही करता येऊ शकतो. परंतु ज्यांना काही महत्त्वाच्या कागदपत्रांची पूर्तता करायची असते किंवा काही वस्तू देखील पोस्टाच्या माध्यमातून थेट घरपोच पोहोचवायच्या असतात, अशा वेळेला खात्रीशीर व्यवस्था आवश्यक असते. आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनामध्ये लोकांना विश्वासार्ह व्यवस्थेची खूप गरज भासते. गेल्या काही वर्षात पोस्ट व्यवस्था ढेपाळली होती आणि त्यातूनच खासगी कुरिअरची व्यवस्था प्रचंड बोकाळलीसुद्धा आहे. ज्याला आपण सेवा उद्योगांमध्ये समाविष्ट केले, अशा या कुरिअर सर्व्हिसने देशभरच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा मोठा उद्योग उभा केलेला आहे. कुरिअर सर्विसमधून अनेकांना रोजगार मिळाला आणि सामान्य माणसालाही अनेक प्रकारची कागदपत्र आणि वस्तू थेट घरपोच पोहोचवता आल्या. त्यासाठी पोस्टाच्या व्यवस्थेवर अवलंबून राहण्याची गरज भासली नव्हती. कारण पोस्टाचा सगळा सरकारी कारभार असल्याने पत्र वेळेवर न पोहोचण्यापासून ते अगदी रजिस्टर केलेली सामुग्रीसुद्धा ठरल्या वेळेत पोहोचेलच याची कोणतीच हमी लोकांना मिळत नव्हती. पोस्ट व्यवस्थेने आपल्या कारभारातला ढिसाळपणा दाखवून दिल्याने लोकांचा पोस्ट व्यवस्थेचा विश्वासही उडाला होता. परंतु गेल्या पाच दहा वर्षांमध्ये देशातील पोस्ट व्यवस्था अधिक मजबूत आणि तंत्रज्ञानयुक्त करण्याचा प्रयत्न झाला. आज देशभरातल्या जवळपास १ लाख ५५ हजार पोस्ट ऑफिसमध्ये आधुनिकीकरण केले गेले आहे. तंत्रज्ञानाचा सर्व प्रकारे वापर केला जातो आहे. मग अगदी ऑनलाईन मनी ट्रान्सफरपासून ते स्पीड पोस्ट पर्यंत अशा उत्तम दर्जाची व्यवस्था दिली जाते आहे. बचतीच्या अनेक योजना खूप प्रभावीपणे राबवल्या जात आहेत आणि पोस्ट ऑफिस हे आता बचत बँक म्हणूनही लोकप्रिय झालेले पाहायला मिळते.

### काळाप्रमाणे 'स्पीड' हवा

आजच्या या धावपळीच्या आणि वेगवान युगामध्ये पोस्टालाही आपल्या कारभारांमध्ये गतीमान होणे अत्यंत आवश्यक होतं. देशभरामध्ये अनेक वर्षांपासून इतकं मोठं जाळं असणारी भारतातील ही सर्वात प्रभावी पोस्ट यंत्रणा आणि व्यवस्था म्हणता येईल. ज्या ठिकाणी पोस्ट कार्यालय आहेत आणि तशा पद्धतीचा कर्मचारी वर्ग सुद्धा कार्यरत आहे. फक्त या सगळ्या व्यवस्थांना गती आणि त्यांच्यातील कार्यक्षमता वाढवण्याची आवश्यकता होती. गेल्या आठ दहा वर्षांमध्ये पोस्ट ऑफिसचे हे महत्त्व सरकारच्याही लक्षात आलं आणि सरकारने त्यात अधिक निधी गुंतवून पोस्ट व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न केला त्याचेच परिणाम म्हणून आता पोस्टाला या वेगवान युगामध्ये स्वतःचं अस्तित्व सिद्ध करण्याची आणि कार्यक्षमता सिद्ध करण्याची संधी प्राप्त झालेली आहे. आज जागतिक पातळीवर अनेक कॉर्पोरेट कंपन्यासुद्धा कुरिअर व्यवस्थेचा उद्योग करतात आणि देश पातळीवरसुद्धा अनेक खाजगी कुरिअर संस्थांनी आपले बस्तान बसवलेले असताना जर पोस्ट ऑफिस एका दिवसामध्ये स्पीड पोस्टच्या माध्यमातून वस्तू किंवा कागदपत्र पोहोचवण्याची हमी देत असेल तर ही भारतातल्या सर्वसामान्य माणसासाठी खूप मोलाची गोष्ट ठरते. कुरिअरला द्यावे लागणारे पैसे आणि त्या तुलनेत पोस्ट ऑफिसच्या स्पीड पोस्ट सेवेला द्यावे लागणारे पैसे यामध्ये थोडाफार फरक पडू शकतो. परंतु पोस्टच्या माध्यमातून आपल्या वस्तू अधिक खात्रीशीर आणि विश्वासपूर्ण रीतीने पोहोचतील याची हमी सरकारच घेत असल्यामुळे या व्यवस्थेवर लोकांचा अधिक भरोसा राहील यात काही शंका नाही. या योजनेच्या प्रसारासाठी जर केंद्र सरकारकडून इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा किंवा प्रसार माध्यमांचा योग्य पद्धतीने वापर होत असेल तर त्याचे देखील स्वागत केले पाहिजे

### अनेक वर्षांची मोठी यंत्रणा


आज देशभरामध्ये या स्पीड पोस्टचा अधिकाधिक प्रसार प्रचार करून लोकांना खात्रीशीर कुरियर व्यवस्था पोस्टाने उपलब्ध करून देण्याचे हे आव्हान स्वीकारले पाहिजे. कर्मचाऱ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण आणि आवश्यक त्या सोयी सुविधा दिल्या जातात. जेणेकरून अधिकाधिक वेगाने लोकांच्या वस्तू किंवा कागदपत्र पोहोचवण्याची यंत्रणा कार्यरत राहाते आता या सगळ्या बदलत्या काळामध्ये एका दिवसातच नव्हे तर काही मिनिटांमध्ये घरपोच वस्तू पोहोचवणाऱ्या खाजगी कंपन्या आपल्याला पाहायला मिळतात. मध्यंतरीच्या काळामध्ये ब्लिंकीट नावाच्या कॉर्पोरेट कंपनीने ही व्यवस्था अस्तित्वात आणली आणि केवळ दहा ते पंधरा मिनिटांमध्ये तुमच्या घरी तुम्ही नोंदवलेली किंवा मागवलेली गोष्ट पोहोचती करण्याचा प्रकार सुरू केला आणि ती व्यवस्था प्रचंड लोकप्रिय झालेली आहे. अशा पद्धतीने पोस्टाला सुद्धा आपल्या कारभारामध्ये खूप मोठा वेग आणता येऊ शकतो आणि पोस्टावरच्या कार्यक्षमतेवर एक नवं शिक्कामोर्तब या निमित्ताने घडवून आणता येऊ शकतं.पोस्टाचा वेग म्हणजेच स्पीड वाढू शकतो. किंवा खाजगी कंपन्यांच्या स्पर्धेत खूप मोठा ठसा उमटवू शकते. आतापर्यंत सरकारनेच दुर्लक्ष केल्याने पोस्ट कारभारामध्ये गतीमानता येऊ शकली नव्हती. जागतिक स्तरावरसुद्धा भारतातील पोस्ट यंत्रणा सर्वात मोठी ठरते. खेड्यापाड्यापर्यंत तिचं जाळं पोहचलेलं आहे. अनेक वर्षांच्या या रेडीमेड व्यवस्थेचा पूर्ण उपयोग करून घेणे अत्यंत गरजेचे होते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

लायकी नसलेल्या माणसाला पद मिळालं की,
लायकी ह्या शब्दाचीही लायकी जाते

## पंचांग



**सोमवार, २२ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ शुक्ल अष्टमी**
**नक्षत्र : उत्तरा फाल्गुनी**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कन्या**

**रवी उदय- ०६-०३**
**रवी अस्त- १९-१८**

**दुर्गाष्टमी; अयन करिदिन; सूर्याचा आर्द्रा नक्षत्र प्रवेश दुपारी १२.२५; वाहन-गाढव; शुक्लादेवी पूजन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




## व्हेज कुर्मा



★ **साहित्यः**
२५० ग्रॅम फ्लावर, १ बटाटा १/४ वाटी वाटाणा, १ कांदा, ३ टोमॅटो. ५-६ लसूण पाकळ्या, १ इंच आले, २ तमालपत्र, ४ काळी मिरी, ३-४ लवंग
२ टेबलस्पून लाल तिखट १ टेबलस्पून कांदा लसूण मसाला, १ टेबलस्पून किचन किंग मसाला, ३ टेबलस्पून तेल, १ टीस्पून जीरे, १ टीस्पून मोहरी,१ टीस्पून हळद, २ टेबलस्पून कोथिंबीर, चवीनुसार मीठ, गरजेनुसार पाणीः चवीनुसार.

★ **कृती** :- प्रथम फ्लावर चिरून घेणे. त्यानंतर फ्लावर, बटाटा आणि वाटाणा कुकरमध्ये दोन शिट्या करून शिजवून घेणे. कांदा टोमॅटो बारीक चिरून घेणे. आले-लसूण पेस्ट तयार करून आता पॅनमध्ये तेल गरम करून यामध्ये जिरे, मोहरी आणि मसाले टाकून फोडणी तयार करून घेणे. नंतर मध्यम आचेवर ते कांदा एकत्र करून परतून घेणे. आता लाल तिखट, टोमॅटो एकत्र करून छान मिक्स करून घेणे. पाच मिनिटे झाकण ठेवून छान तेल सुटेपर्यंत परतून घेणे. आता यामध्ये कांदा, लसूण, मसाला, किचन किंग मसाला एकत्र करा. आता या मिश्रणामध्ये शिजवलेल्या भाज्या मिक्स करणे. आता मीठ आणि पाणी टाकून छान मिक्स करून घेणे. दहा मिनिटे छान वाफवून घेणे. वरून कोथिंबीर टाकून सर्व्ह करणे. अशाप्रकारे कुर्मा तयार. पुरी सोबत, पोळी सोबत खूपच सुंदर लागतो ट्राय करून बघा.

# १२ वर्षांनंतर जर्मनी प्रथमच बाद फेरीत

## आयव्हरी कोस्ट संघाचा २-१ ने पराभव

**टोरेंटो स्टेडियम येथे झालेल्या फिफा विश्वचषकाच्या 'गट ड' मधील एका सामन्यात आयव्हरी कोस्टला २-१ ने पराभूत करून जर्मनीने १२ वर्षांनंतर पहिल्यांदाच बाद फेरीत प्रवेश मिळवला. हा जर्मनीचा सलग दुसरा विजय आहे. या सामन्याचा नायक डेनिस उंडाव होता, ज्याने जर्मनीसाठी दोन गोल केले. या विजयामुळे अमेरिका आणि कॅनडापाठोपाठ जर्मनी बाद फेरी गाठणारा तिसरा संघ ठरला. २०१४ चा विश्वचषक जिंकल्यानंतर जर्मन संघाने फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीत पोहोचण्याची ही पहिलीच वेळ आहे. २०१८ आणि २०२२ च्या विश्वचषकांमध्ये जर्मनी गट फेरीतच बाहेर पडला होता.**



**२३ जूनला विश्वचषकाचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| मध्यरात्री १२:३० | फ्रान्स विरुद्ध इराक |
| पहाटे ४:३० | नॉर्वे विरुद्ध सेनेगल |
| सकाळी ७:३० | अर्जेंटिना विरुद्ध ऑस्ट्रिया |
| सकाळी १०:३० | जॉर्डन विरुद्ध अल्जीरिया |

■ टोरेंटो

आयव्हरी कोस्टच्या मजबूत बचावाने जर्मनीला बराच काळ अडचणीत आणले. जर्मनीने चेंडूवर ताबा आणि आक्रमणांवर वर्चस्व राखले तरीही आयव्हरी कोस्टने पहिला गोल केला. ३० व्या मिनिटाला अमाद डायलोच्या धोकादायक पासने जर्मन बॉक्समध्ये प्रवेश केला, जिथे कर्णधार फ्रँक केसीने संधी साधून हेडरद्वारे चेंडू जाळ्यात टाकला. या गोलमुळे आयव्हरी कोस्टने १-० अशी आघाडी घेतली. पहिल्या हाफमध्ये जर्मनीला दोन मोठे धक्के बसले. हावर्ट्झचा शानदार हेडर गोलकीपर याहिया फोफानाने उत्कृष्टरित्या अडवला, तर अलेक्झांडर पावलोविचचा कॉर्नर गोल फाऊलमुळे रद्द करण्यात आला. मध्यंतरापर्यंत जर्मनी ०-१ ने मागे होता आणि संघावरील दबाव वाढत होता. दुसऱ्या हाफमध्ये जर्मनीने सतत आक्रमणे केली आणि त्यांचे बदल यशस्वी ठरले. अखेरीस ६८ व्या मिनिटाला डेनिस उंडावने गोल करून १-१ अशी बरोबरी साधली. त्यानंतर सामना अत्यंत रोमांचक झाला. ८८ व्या मिनिटाला आयव्हरी कोस्टच्या सायमन अडिंग्राला एक सुवर्णसंधी मिळाली, पण तो त्याचा फायदा उठवू शकला नाही. या चुकीमुळेच अखेरीस त्यांना पराभव पत्करावा लागला. ९०+४ मिनिटाला फेलिक्स नमेचाने बॉक्समध्ये असलेल्या उंडावला एक अप्रतिम पास दिला. स्टटगार्टच्या स्ट्रायकरने उत्कृष्ट नियंत्रण दाखवत चेंडू जाळ्यात टाकला आणि जर्मनीला २-१ असा नाट्यमय विजय मिळवून दिला. या विजयासह जर्मनीनं आपला सलग दुसरा विजय नोंदवला.

# ट्युनिशियाचा विश्वचषकातील प्रवास संपुष्टात

## जपानचा ४-० असा एकतर्फी विजय

■ ग्वाडालुपे

**एस्टाडियो** मॉन्टेरी येथे झालेल्या फिफा विश्वचषकाच्या गट 'एफ'च्या सामन्यात जपानने धडाकेबाज कामगिरी करून ट्युनिशियावर ४-० असा एकतर्फी विजय नोंदवला. विश्वचषकाच्या इतिहासात जपानने एकाच सामन्यात ४ गोल करण्याची ही पहिलीच वेळ आहे. या पराभवामुळे ट्युनिशियाचा स्पर्धेतील प्रवास संपुष्टात आला.



सामन्याच्या सुरुवातीपासूनच जपानच्या आघाडीच्या फळीने ट्युनिशियाच्या बचावावर वर्चस्व गाजवले. दाइची कामादाने चौथ्या मिनिटाला जपानचा पहिला गोल करुन संघाला सुरुवातीलाच आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ३१ व्या मिनिटाला आयासे उएदाने संघासाठी दुसरा गोल केला. ६९ व्या मिनिटाला जुन्या इतोने गोल करून स्कोअर ३-० असा केला, तर ८३ व्या मिनिटाला आयासे उएदाने आपला दुसरा आणि संघाचा चौथा गोल करुन ट्युनिशियाच्या पुनरागमनाच्या सर्व संधी संपुष्टात आणल्या. या दारुण पराभवानंतर ट्युनिशिया गटात चौथ्या (शेवटच्या) स्थानावर घसरला आणि त्यांचा पुढील मार्ग अत्यंत कठीण दिसत आहे. या प्रभावी आणि सर्वसमावेशक विजयामुळे जपानने गुणतालिकेत आपले स्थान मजबूत केले आहे आणि आता तो गट 'एफ'मध्ये दुसऱ्या स्थानावर आहे.

# इक्वेडोर आणि कुराकाओचा विश्वचषक सामना अनिर्णित

■ कॅन्सस सिटी

**कॅन्सस** सिटी स्टेडियममध्ये झालेल्या फिफा विश्वचषकाच्या 'ई' गटातील सामन्यात इक्वेडोर आणि कुराकाओ संघांना पूर्ण वेळेपर्यंत गोल करता आला नाही. परिणामी सामना ०-० असा अनिर्णित राहिला. या सामन्यात दोन्ही संघांच्या बचावफळीने उत्कृष्ट कामगिरी करत प्रतिस्पर्धी फॉरवर्ड्सना गोल करण्याची कोणतीही संधी दिलीच नाही. या गोलशून्य बरोबरीनंतर दोन्ही संघांना गुणतालिकेत प्रत्येकी एका गुणावर समाधान मानावे लागले. या सामन्यानंतर गटातील क्रमवारीही बदलली असून इक्वेडोर सध्या तिसऱ्या, तर कुराकाओ चौथ्या स्थानावर आहे. आगामी सामन्यांमध्ये दोन्ही संघांसाठी प्रत्येक गुण निर्णायक ठरेल.

# इंग्लंड विरुद्ध ३ वनडे मालिका! भारतीय संघाची घोषणा

■ मुंबई

**इंग्लंडविरुद्धच्या** तीन वनडे सामन्यांच्या मालिकेसाठी बीसीसीआयने आज भारतीय क्रिकेट संघाची घोषणा केली. या संघात शुभमन गिलची कर्णधारपदी आणि श्रेयस अय्यरची उपकर्णधारपदी म्हणून नियुक्त करण्यात आले, तर अनुभवी फलंदाज विराट कोहलीचे संघात पुनरागमन झाले. मात्र, त्याची निवड तंदुरुस्तीच्या मंजुरीवर अवलंबून असेल. मात्र

## यशस्वी जैस्वालला वगळले

अफगाणिस्तानविरुद्ध तिसऱ्या वनडे सामन्यात ११० धावांची खेळी करणाऱ्या यशस्वी जैस्वालला संघातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे.

निवड समितीने संघात अनुभव आणि युवा खेळाडूंचे संतुलित मिश्रण समाविष्ट केले. अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर आणि नितीश कुमार रेड्डी यांची अष्टपैलू विभागात निवड करण्यात आली. जसप्रीत बुमराह संघात परतला आहे. त्याला अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी आणि तीन वनडे सामन्यांच्या मालिकेत विश्रांती देण्यात आली होती. त्यासोबत अर्शदीप सिंग, प्रसिद्ध कृष्णा, हर्षित राणा आणि गुरनूर ब्रार, कुलदीप यादव यांची निवड केली आहे. मिस्ट्री स्पिनर वरुण चक्रवर्ती अद्याप दुखापतीतून पूर्णपणे सावरलेला नाही.

**भारतीय संघ**

शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), केएल राहुल (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, नितीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, प्रसिद्ध कृष्णा, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, गुरनूर ब्रार.

# योग शिबिरात श्रेयस, रितू सर्वोत्तम

**मुंबई** - आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त नागरिक सहाय्यक केंद्र संचलित वडाळ्यातील ज्ञानेश्वर विद्यालयातर्फे झालेल्या समाजसेविका स्व. मंगलाताई अडसूळ ट्रॉफी योग शिबिरात शालेय लहान गटात श्रेयस जायभाये आणि मोठ्या गटात रितू जगताप यांनी सर्वोत्तम योग शिबिरार्थीचा पुरस्कार पटकाविला. विजेत्यांना चषक देऊन शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण, केंद्राचे सचिव सूर्यकांत कोरे व मुख्याध्यापक महेंद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात आले. आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने योग शिबिरात लहान गटात काव्या म्हसकर द्वितीय व अर्णव कांबळे तृतीय तर मोठ्या गटात यश पोकळे द्वितीय व छायांक उघडे तृतीय पुरस्कार विजेते ठरले.

# कॅपच्या खेळीमुळे भारत पराभूत

## द. आफ्रिकेचा ६ विकेटने विजय

■ मँचेस्टर

**मॅरिझॅन** कॅपच्या नाबाद ८१ धावांच्या धडकेबाज खेळीच्या बळावर दक्षिण आफ्रिकन महिला संघाने भारतावर ६ विकेटने विजय मिळवला. या पराभवामुळे भारतीय संघाची विजयाची हॅट्ट्रिक हुकली. मँचेस्टर येथे झालेल्या महिला टी-२० विश्वचषकाच्या १८ व्या अटीतटीच्या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेपुढे विजयासाठी १५८ धावांचे आव्हान दिले होते. या प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेने १९.५ षटकांत ४ बाद १६१ धावा केल्यामुळे भारताला या स्पर्धेत पहिला पराभव पत्करावा लागला. भारताकडून स्मृती मंधाना १७, शफाली वर्मा ३१, हरमनप्रीत कौर २४, दीप्ती शर्मा २९ धावा, रिचा घोष १५ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून मॅरिझॅन कॅपने ४५चेंडूंत ४ षटकार व ७ चौकारांसह नाबाद ८१ धावा केल्या. तिला टॅझमिन ब्रिट्सने ३६ चेंडूंत ४० धावा करून चांगली साथ दिली. या जोडीच्या ९८ धावांच्या भागिदारीमुळे दक्षिण आफ्रिकेने १९.५ षटकांत विजयी आकडा गाठला. पराभव झाला तरी भारतीय संघाचे ग्रुप १ च्या गुणतालिकेतील ४ गुणांसह दुसरे स्थान कायम असून, दक्षिण आफ्रिकेने ४ गुणांसह तिसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे.

# नेदरलँडने स्वीडनचा ५-१ ने धुव्वा उडवला

■ ह्यूस्टन

**फिफा** विश्वचषकाच्या गट 'एफ'च्या सामन्यात नेदरलँडने अफलातून कामगिरी करून स्वीडनला ५-१ ने पराभूत केली. ह्यूस्टन स्टेडियमवर झालेल्या या स्पर्धेच्या ३५ व्या सामन्यात नेदरलँडने सुरुवातीपासूनच सामन्यावर नियंत्रण मिळवले आणि स्वीडनला पुनरागमन करण्याची कोणतीही संधी दिली नाही. ब्रायन ब्रॉबी आणि कोडी गाक्पो यांनी प्रत्येकी दोन गोल केले, तर क्रिसेन्सियो सोमरविलने एक गोल करून संघाचा विजय निश्चित केला.

नेदरलँडने सामन्याच्या सुरुवातीच्या मिनिटांपासूनच आक्रमक खेळ दाखवला. संघाला याचे फळ पाचव्या मिनिटाला मिळाले, जेव्हा ब्रायन ब्रॉबीने एक उत्कृष्ट गोल करून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पहिल्या गोलनंतर स्वीडनवर दबाव आला आणि नेदरलँडने आक्रमण सुरुच ठेवले. नेदरलँडचा आक्रमक खेळ इथेच थांबला नाही, १७ व्या मिनिटाला ब्रॉबीने पुन्हा एकदा आपले कौशल्य दाखवत आपला दुसरा गोल करून २-० अशी आघाडी घेतली. दोन गोलने मागे पडल्यानंतर स्वीडनने काही आक्रमक खेळ केला. परंतु नेदरलँडच्या मजबूत बचावापुढे त्यांना यश आले नाही. पहिल्या हाफच्या अखेरीस नेदरलँड २-० ने आघाडीवर होते.

४७व्या मिनिटाला कोडी गाक्पोने गोल करून आपली आघाडी ३-० पर्यंत वाढवली. त्यानंतर ५४व्या मिनिटाला गाक्पोने आपला दुसरा गोल करुन स्कोअर ४-० केला. स्वीडनला हे अविरत हल्ले रोखण्यासाठी संघर्ष करावा लागला. ४ गोलने मागे पडल्यानंतर स्वीडनला ५९ व्या मिनिटाला पहिले यश मिळाले. अँथनी एलांगाने एक शानदार गोल करुन संघासाठी खाते उघडले आणि स्कोअर ४-१ केला. मात्र, स्वीडनला पुन्हा लय मिळवता आली नाही.



# सुख शांती समाधान

## वटपौर्णिमा विशेष

**हिंदू धर्मातील प्रत्येक सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. धार्मिक ग्रंथांनुसार, वटपौर्णिमेचे व्रत केल्याने सुखी वैवाहिक जीवन आणि सुख-समृद्धीसाठी मिळते. यासोबतच तुमच्या पतीला दीर्घायुष्याचा आशीर्वाद देखील मिळतो. कॅलेंडरनुसार, दरवर्षी ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेला वटसावित्री व्रत साजरे केले जाते. या दिवशी विवाहित महिला उपवास करतात आणि त्यांच्या पतींच्या दीर्घायुष्यासाठी वडाच्या झाडाची पूजा करतात. या व्रताचे काही खास नियम आहेत जे वैवाहिक जीवन आनंदी बनवतात, असे मानले जाते.**

**हिंदू** मान्यतेनुसार, महिलांना शाश्वत सुखाचे वरदान देणाऱ्या वट सावित्री व्रतामध्ये केवळ पूजाच नाही, तर त्याच्याशी संबंधित पवित्र कथेचे पठण करून पुण्यही मिळवले जाते. योग्य विधींसह हे व्रत पाळणाऱ्या विवाहित महिलांना शाश्वत सुखाचा आशीर्वाद मिळतो. पंचांगानुसार, पतीचे आयुष्य वाढवणारे वट सावित्री व्रत यावर्षी

वटसावित्री पौर्णिमा सोमवार, २९ जून २०२६

पौर्णिमा तिथी सुरू : २८ जून २०२६ रोजी उत्तर रात्रौ ३.०६ वाजता. पौर्णिमा तिथी समाप्त : २९ जून २०२६ रोजी उत्तर रात्रौ ५.२६ वाजता.

महाराष्ट्र, गुजरात आणि दक्षिण भारतात अमांत पंचांगानुसार वटसावित्री व्रत पौर्णिमेला साजरे केली जाते. तर उत्तर भारतात पूर्णिमांत पंचांगानुसार अमावस्येला वटपौर्णिमा साजरी करतात.



वट पौर्णिमेचे व्रत करणाऱ्या महिलांनी लाल, पिवळे आणि हिरवे कपडे परिधान करावेत. हे रंग शुभ मानले जातात. जसे लाल किंवा पिवळी साडी, हिरव्या बांगड्या, लाल बिंदी, मेहंदी इ.

वट सावित्री व्रताची पूजा विधी- सकाळी लवकर उठून स्नान करा. लाल किंवा पिवळ्या रंगाचे पारंपरिक वस्त्र परिधान करा. १६ शृंगार करा.

सर्व पूजा साहित्य घेऊन वटवृक्षाजवळ जाऊन त्याची स्वच्छता करा. वृक्षाच्या मुळाशी जल अर्पण करा आणि पूजा करा. मौलीचा धागा वटवृक्षाभोवती ७ वेळा गुंडाळा. प्रत्येक परिक्रमेत पतीच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करा.

वटवृक्षाखाली बसून सावित्री-सत्यवानाची कथा वाचा किंवा ऐका. वृक्षाची आरती करा आणि व्रत पारण सात्विक अन्नाने करा.

वाढत्या वृक्षतोडीमुळे आणि झाडांची लागवडच कमी होत असल्याने अनेक वेळा घराजवळ किंवा परिसरात वडाचे झाडच नसते. अशा वेळी पूजा कशी करावी उपवास कसा करावा, हे जाणून घेऊया-

वटपौर्णिमेच्या दिवशी सूर्योदयापूर्वी उठून स्नान करा, स्वच्छ कपडे परिधान करा आणि व्रताचा संकल्प करा की मी माझ्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी व सुख-समृद्धीसाठी हे व्रत करत आहे.

जर वडाचे झाड प्रत्यक्षात उपलब्ध नसेल, तर त्याचा पर्याय वापरता येतो. पर्याय म्हणून पुढील गोष्टींचा वापर करू शकता- वडाच्या झाडाचा फोटो किंवा चित्र (वटपौर्णिमेचा कागद बाजारात मिळतो). माती अथवा धातूपासून बनवलेली वडाच्या झाडाची मूर्ती- हे सर्व प्रतीक स्वरूपात वापरून ती वस्तू पूजा करण्याच्या ठिकाणी ठेवा.



पूजेच्या वेळी वडाच्या झाडाचे प्रतीक आणि सावित्री-सत्यवान यांच्या प्रतिमा/ चित्र समोर ठेवा. कलशाची स्थापना करा आणि विधिपूर्वक पूजा करा. व्रतकथा वाचा किंवा ऐका. धाग्याने वडाच्या झाडाच्या प्रतीमेची सात वेळा प्रदक्षिणा घाला व धागा बांधा.

पूजा साहित्य:- २ हिरव्या बांगड्या, शेंदुर, एक गळसरी, अत्तर, कापुर, पंचामृत, पुजेचे वस्त्र, विड्याचे पाने, सुपारी, पैसे, गुळ खोबऱ्याचा नैवेद्य, ५ फळे (जांभूळ, करवंद, केळी, फणस, आंबे), दुर्वा, गहु, सती देवीचा फोटो किंवा सुपारी इ., सुवासिनींची ओटी भरण्यासाठी फळ, गहू.

पूजन विधी:- प्रथम सुपारीच्या गणपतीची स्थापना करावी. त्याची हळद कुकुं अक्षता वाहुन पंचोपचार पूजा करावी. त्यानंतर सती मातेच्या सुपारीची पण पंचोपचार पूजन करावे. वडाच्या मूळाजवळ पुरुष सुक्तासह षोडशोपचार अभिषेक करून पूजन व आरती करावी.

सूत गुंडाळताना या मंत्राचा उच्चार करावा.

अवैधव्यं च सौभाग्यं देहि त्वं मम सुव्रते।

पुत्रान् पौत्रांश्च सौख्यं च गृहाणार्घ्यं नमोस्तुते।।

वटवृक्षाला पाणी अर्पण करताना या मंत्राचा उच्चार करावा...

वट सिंचामि ते मूलं सलिलैरमृतोपमैः।

यथा शाखाप्रशाखाभिर्वृद्धोसि त्वं महीतले।

तथा पुत्रैश्च पौत्रैस्च सम्पन्नं कुरु मां सदा।।

खालील मंत्र म्हणून वडास नमस्कार करावा.

सावित्री ब्रह्मा वादिनी सर्वदा प्रिय भाषिणी।

तेन सत्येनमां पाहि दुःखसंसार सागरात।।

अवियोगि यथा देव सवित्र्या सहीतस्य ते।

अवियोग तथास्माकं भूयात् जन्म जन्मनि।।

वट सावित्री व्रताच्या दिवशी, उपवास करणाऱ्या महिलांनी त्यांच्या कपड्यांमध्ये काळा, निळा आणि पांढरा रंग वापरू नये. तसेच या रंगांच्या बांगड्या, साडी, बिंदी इत्यादी वापरू नका. खोटे बोलू नका, कोणाचाही अपमान करू नका किंवा कोणतेही नकारात्मक विचार तुमच्या मनात येऊ देऊ नका. दिवसभर शारीरिक आणि मानसिक शुद्धता राखा. या दिवशी स्त्रिया सावित्रीच्या भक्तीचा आदर्श ठेवून वटवृक्षाची पूजा करतात. तसेच, पतीच्या दिर्घायुष्यासाठी व सुख समृद्धीसाठी प्रार्थना करतात.

पूजा केल्याशिवाय उपवास सोडू नका. याशिवाय, वट सावित्री व्रताच्या दिवशी तामसिक गोष्टी टाळा. पाच सुवासिनींची आंबे व गव्हाने ओटी भरावी.

पूजा संपल्यानंतर, लोक सुखी वैवाहिक जीवनासाठी देवी सावित्री आणि वटवृक्षाचे आशीर्वाद घेतात. तसेच, पूजा करताना, वट सावित्री व्रत कथा म्हणजेच सावित्री आणि सत्यवानाची कथा देखील ऐकावी.

वटसावित्री कथा- असे मानले जाते की, प्राचीन काळी भद्रदेशात अश्वपती नावाचा राजा राज्य करत होता. तो अत्यंत दयाळू आणि धार्मिक होता, पण त्याला मूलबाळ नव्हते. असे मानले जाते की, ज्योतिषांच्या सल्ल्यानुसार, त्याने आपली अपत्यप्राप्तीची इच्छा पूर्ण करण्यासाठी एक भव्य यज्ञ केला. त्यानंतर, त्याला एक सुंदर मुलगी झाली, जिचे नाव त्याने सावित्री ठेवले. त्याला बऱ्याच वर्षांनंतर एक कन्या झाली, जिचे नाव 'सावित्री' ठेवले. सावित्री जेव्हा विवाहयोग्य झाली, तेव्हा तिने स्वतःसाठी सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व देशाचा राजकुमार होता, ज्याचे राज्य नष्ट झाले होते आणि त्याचे आई-वडील जंगलात राहत होते. एक दिवस देवर्षी नारदांनी राजा अश्वपतीला सांगितले की, सत्यवान गुणी आणि पराक्रमी असला तरी तो अल्पायुषी आहे आणि लग्नानंतर बरोबर एका वर्षाने त्याचा मृत्यू होईल. हे ऐकून राजाने सावित्रीला दुसरा वर निवडण्यास सांगितले, पण सावित्री आपल्या निर्णयावर ठाम राहिली. तिने सत्यवानाशीच विवाह केला आणि ती जंगलात पती आणि सासू-सासऱ्यांची सेवा करू लागली. नारदमुनींनी सांगितलेली वेळ जवळ आली, त्या दिवशी, जेव्हा सत्यवान लाकडे तोडण्यासाठी वनात जात होता, तेव्हा सावित्रीसुद्धा त्याच्यासोबत गेली. सत्यवान वनात लाकडे तोडत असताना, अचानक त्याच्या डोक्यात तीव्र वेदना होऊ लागल्या आणि तो सावित्रीच्या मांडीवर डोके ठेवून झोपला. सावित्रीने अचानक पाहिले की यमराज आपल्या दूतांसहित तिथे आले होते. यानंतर, जेव्हा यमराज सत्यवानाचा जीव घेऊन दक्षिणेकडे जाऊ लागले, तेव्हा सावित्रीसुद्धा त्यांच्यामागे जाऊ लागली. यमधर्माने सावित्रीला अनेक प्रलोभने दाखवली आणि माघारी फिरण्यास सांगितले, पण तिने नकार दिला यमधर्माने तिला पतीच्या प्राणाव्यतिरिक्त कोणतेही तीन वर मागण्यास सांगितले.

सावित्रीने अत्यंत बुद्धीचातुर्याने खालील तीन वर मागितले: १. सासू-सासऱ्यांना त्यांचे राज्य परत मिळावे. २. सासू-सासऱ्यांना अपत्य व्हावे. ३. आपल्याला सत्यवानापासून १०० तेजस्वी पुत्र व्हावे. यमधर्माने 'तथास्तु' म्हटले.

यावर सावित्रीने यमधर्माला विचारले की, जर माझा पती जिवंतच नसेल, तर मला शंभर पुत्र कसे होतील? हे ऐकून यमधर्म प्रसन्न झाले त्यांनी सावित्रीचे पातिव्रत्य, बुद्धी आणि निष्ठा पाहून सत्यवानाचे प्राण परत केले. त्यानंतर सावित्री सत्यवानाच्या मृतदेहाजवळ आली आणि तिने वडाच्या झाडाची पूजा केली काही वेळाने सत्यवान जिवंत झाला तेव्हापासून पतीच्या दीर्घायुष्यासाठी ज्येष्ठ पौर्णिमेला वडाच्या झाडाची पूजा करण्याची आणि सावित्रीच्या कथेचे स्मरण करण्याची प्रथा सुरू झाली.

**टीप-** या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

# आंध्र प्रदेशात सापडला सोन्याचा प्रचंड खजिना

■ हैदराबाद

**भारतातील** दक्षिणेकडील आंध्र प्रदेश राज्यात सोन्याचा प्रचंड खजिना सापडला. त्यामुळे पुढील काही वर्षांत आंध्र प्रदेश देशातील सोन्याचा मोठा पुरवठादार बनू शकतो.आंध्रातील एकट्या कुर्नूल जिल्ह्यातील जोन्नागिरी गावात अंदाजे ५० टन सोन्याचा साठा सापडला आहे. खाण विभागाचे प्रधान सचिव मुकेश कुमार मीना यांनी नव्याने सापडलेल्या खाणींबाबत माहिती दिली. जोन्नागिरी व्यतिरिक्त सोन्याच्या खाणकामासाठी आणखी चार संभाव्य जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. यामध्ये रामगिरी,जाववाकुला आणि चिगुरुकुंटा बिस्नाटम यांचा समावेश आहे.एकट्या जोन्नागिरीमध्येच ५० टन सोन्याचा साठा आहे. यामुळेच भविष्यात आंध्र प्रदेश काही वर्षांत देशातील सोन्याचा सर्वात मोठा पुरवठादार बनू शकतो. सरकारने या खनिजसंपन्न जागांचे अधिक अन्वेषण आणि विकास करण्याची योजना आखली आहे.

# मराठा मंदिर सीबीएसई इंग्लिश स्कूल ११ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

■ दापोली

**मराठा** विद्या प्रसारक मंडळी, दापोली-खेड-मंडणगड संचलित मराठा मंदिर सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूल, दापोली या प्रशालेचा ११ वा वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी संस्थेचे पदाधिकारी विजय दळवी, मनोहर सावंत, राकेश विचारे, संज्योत सावंत आणि वृषाली शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विजय दळवी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त आणि सामाजिक जाणीव यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जनाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकासाकडेही लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी ब्रिलियंट करिअर अकॅडमी, दापोलीचे संचालक तथा डिस्टिक्टिव्ह एज्युकेशन सोसायटी, दापोलीचे संस्थापक संदीप राजपुरे, रामराजे इंटरनॅशनल स्कूल सीबीएसई, दापोली शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या रुचिका नलावडे व रेखा जेगरकल, तसेच ब्रिलियंट करिअर अकॅडमीचे डमिनिस्ट्रेटर कुणाल मंडलिक उपस्थित होते.कार्यक्रमाला मराठा मंदिर सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक अरविंद मांडवकर, रामराजे इंटरनॅशनल स्कूल सीबीएसई, दापोलीचे मुख्याध्यापक शेखर पाटील, तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# साकीनाक्याचा विघ्नहर्ता गणेशोत्सव मंडप पूजन संपन्न

■ मुंबई



**चांदिवली** येथील सफेदपुल येथील श्रीकृष्ण मित्र मंडळाचा साकीनाक्याचा विघ्नहर्ता यांच्या ४२ व्या वर्षाच्या गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या गणपती मंडप पूजनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या प्रसंगी माहिती अधिकार कार्यकर्ते आणि मंडळाचे सल्लागार अनिल गलगली यांच्या शुभहस्ते मंडप पूजन करण्यात आले. कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत माने, सेक्रेटरी संदीप साळवे तसेच रत्नाकर शेट्टी, जिगर जैन, रियाज वजीर मुल्ला आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी मंडळाच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याचे कौतुक करत गणेशोत्सव यशस्वी, मंगलमय आणि भक्तिमय वातावरणात पार पडावा, अशा शुभेच्छा दिल्या.

श्रीकृष्ण मित्र मंडळ गेली ४२ वर्षे गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी, सांस्कृतिक जतन आणि जनजागृतीचे कार्य करत आहे.

# कोर्टात वाद तरी शिवसेना एकच म्हणण्याची अमित शहांना घाई का?

**उबाठा नेते अखिल चित्रेंची पोस्ट**

■ मुंबई

**केंद्रीय** गृहमंत्री अमित शहा यांनी काल कोल्हापुरात शिवसेना एकच आहे, असे विधान केले. या वक्तव्यावर उबाठा नेते अखिल चित्रे यांनी आक्षेप घेतला. शिवसेनेच्या नाव आणि पक्षावरील वादासंदर्भातील अनेक महत्त्वाचे मुद्दे अद्याप सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना अमित शहांनी आधीच निकाल का जाहीर केला?

अखिल चित्रे यांनी एक्स पोस्ट करून लिहिले की, शिवसेना एकच आहे, असे सांगण्याची अमित शहांना एवढी घाई का? सर्वोच्च न्यायालयात अनेक महत्त्वाचे मुद्दे अद्याप प्रलंबित असताना, अमित शहांनी आधीच निकाल देऊन टाकला आहे. न्यायालयाचा अंतिम निर्णय येण्यापूर्वीच एकच शिवसेना आहे, असे जाहीर करणे, हा न्यायप्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न आहे. खरे तर महाराष्ट्राला संपूर्ण सत्य माहिती आहे. शिंदे सेना ही कुठली स्वाभाविक राजकीय चळवळ नाही. ती भाजपाची 'टेस्ट ट्यूब बेबी' आहे. ज्या पक्षाला स्वतःच्या ताकदीवर शिवसेनेचा सामना करता आला नाही, त्यांनी पक्षफोडीचा मार्ग निवडला. लोकशाही मूल्यांचा आणि बाळासाहेब ठाकरेंनी उभारलेल्या पक्षाचा विश्वासघात करून सत्तेचा खेळ मांडला. पण नाव, चिन्ह आणि सत्ता मिळवून इतिहास बदलत नाही. महाराष्ट्राच्या मनात आजही फरक स्पष्ट आहे.

# पुण्यात पहाटे चकमक एक आरोपी जखमी

■ पुणे

**पुणे** शहरातील वानवडी परिसरात आज पहाटे पोलीस आणि एका आरोपींमध्ये चकमक झाली. यात एक आरोपी जखमी झाला असून त्याच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. एका पोलीस अधिकाऱ्यालाही किरकोळ दुखापत झाली आहे.

आज पहाटे वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही चकमक घडली. करण सिंग या आरोपीवर ३० हून अधिक गंभीर गुन्ह्यांची नोंद असून, तो वानवडी परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी आरोपीला पकडण्यासाठी सापळा रचला होता. पोलिसांनी आरोपीला अडवण्याचा प्रयत्न करताच त्याने जवळील बंदुकीतून पोलिसांवर गोळीबार सुरू केला. या हल्ल्यानंतर स्वसंरक्षणासाठी उपस्थित असलेल्या एका पोलिस अधिकाऱ्याने आरोपीच्या दिशेने गोळी झाडली.

# मुंबई कोस्टल रोडचे दोन्ही बोगदे आता 'अग्निरोधक' बनवणार!

**पालिका ६.३२ कोटी रुपये खर्च करणार**

■ मुंबई

**पालिका** प्रशासनाने कोस्टल रोडवरील दोन बोगद्यातील सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी विशेष पावले उचलली आहेत. आता हे बोगदे 'फायर प्रूफ' म्हणजेच 'अग्निरोधक' बनवले जाणार आहेत.त्यासाठी बोगद्याच्या सुरक्षेत 'वॉटर मिस्ट टर्बाईन' सारखी अत्याधुनिक वाहने तैनात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी पालिका ३ कोटी ३२ लाख रुपये खर्च करणार आहे. याबाबतचा प्रस्ताव बुधवार २४ जून रोजी होणाऱ्या स्थायी समिती बैठकीत मंजुरीसाठी ठेवला जाणार आहे.

हे टर्बाइन पाण्याचे अत्यंत सूक्ष्म थेंब (मिस्ट) तयार करते. हे बारीक थेंब आगीभोवती पसरतात. हे थेंब बाष्पीभवन होऊन आगीचा ऑक्सिजन पुरवठा खंडित करतात,ज्यामुळे आग जलद गतीने आटोक्यात येते.या शक्तिशाली टर्बाइन्सच्या वाऱ्याच्या दाबाने बोगद्यातील विषारी धूर बाहेर ढकलला जातो, ज्यामुळे बचावकार्यात मदत होते.कोस्टल रोडच्या बोगद्याच्या दोन्ही बाजूंना ही विशेष वाहने सज्ज ठेवण्यात येतील.या वाहनांवर वॉटर मिस्ट टर्बाइन बसवलेले असतात, जेणेकरून कोणत्याही कोपऱ्यात लागलेल्या आगीवर १०० ते १५० मीटर अंतरावरून थेट मारा करता येईल.या वॉटर मिस्ट टर्बाइन

वाहनाची बांधणी, पुरवठा, चाचणी व कार्यान्वतीकरण दोन वर्षाच्या हमी कालावधीसह खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. बुधवार २४ जून रोजी होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत तसा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात येणार आहे.

# मध्य रेल्वे मार्गावर दोन दिवस मध्यरात्री विशेष मेगाब्लॉक

■ मुंबई

**दिवा** स्थानकाच्या दक्षिण टोकाला (सीएसएमटी बाजू) उभारण्यात येत असलेल्या नवीन पादचारी पुलासाठी गर्डर बसविण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामासाठी मध्य रेल्वेकडून सोमवार आणि मंगळवारी मध्यरात्री विशेष ट्रॅफिक व पॉवर ब्लॉक घेण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाकडून ३०० टन क्षमतेच्या रोड क्रेनच्या सहाय्याने पादचारी पुलाचे गर्डर बसविण्यात येणार आहेत. यासाठी सोमवारी रात्री १२.१० ते मंगळवारी पहाटे ४.१० वाजेपर्यंत विशेष ब्लॉक घेण्यात येईल.या कालावधीत कल्याण-ठाणेदरम्यान अप जलद मार्गावरील काही मेल आणि एक्स्प्रेस गाड्या अप धीम्या मार्गावरून चालविण्यात येणार आहेत. लोकमान्य टिळक टर्मिनस-पाटलीपुत्र सुपरफास्ट एक्स्प्रेस, एलटीटी-विशाखापट्टणम एक्स्प्रेस आणि एलटीटी-गोरखपूर कुशीनगर सुपरफास्ट एक्स्प्रेस या गाड्या मुलुंड-कल्याणदरम्यान डाऊन जलद मार्गावरून वळविण्यात येतील.

# जिममध्ये व्यायाम करताना पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू

■ डेहराडून

**उत्तराखंड** पोलीस दलातील कॉन्स्टेबल आणि विशेष कार्यबल (एसओजी) जवान गिरीश भट्ट यांचा जिममध्ये व्यायाम करत असताना मृत्यू झाला. व्यायामादरम्यान अचानक प्रकृती बिघडल्याने ते जिममध्येच कोसळले. त्यानंतर उपस्थितांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला असून त्यामध्ये गिरीश भट्ट व्यायाम करताना अचानक खाली कोसळल्याचे दिसतात. गिरीश भट्ट हे मूळचे पिथौरागढ जिल्ह्यातील रहिवासी होते. सध्या ते भजनपूर परिसरात वास्तव्यास होते.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**

**पिनकोड - ४१० २०६**

E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in

**दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स- ०२२-२७४६७४४०**

**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ०५ ( ई - निविदा) सन २०२६ - २७**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www. mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप-** या निविदेमध्ये एकूण ०७ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २०.०५.२०२६ सकाळी १०.०० ते दिनांक २९.०६.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./ सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :-

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**

क्रमांक: आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी १२२५


**NOTICE**

Notice is hereby given that the title deed & share certificate of Flat No. B/603 in the building called Gulshan Villa Premises Co-op. Hsg. Society having registration No. (Bom/Gen/1011 of 1977), situated at Gulshan Building No. 1, Juhu Cross Road, off Barfiwala Marg, Andheri West, Mumbai - 400058 is lost/misplaced since long.

Any person having any claim in respect of aforesaid title deed & share certificate, should lodge such claim with below signing within 7 days of publication of this notice, after which no claims shall be entertained.

**Sd/-**
**M/s Babulal Diyora & Co.**
**Chartered Accountants**
105, Aman Chambers Opera House, Mumbai - 400004.
Date : 22/06/2026
Place : Mumbai

# नवाकाळ शब्दकोडे-१६४४



**आडवे शब्द –**

२. दादागिरी ५. आकर्षण, लोभ ८. कलावंतीण १०. वाहनाचा मुख्य भाग, चक्र १२. अर्जुनाचे धनुष्य १३. माळजमीन १५. विळखा १८. करारावर सर्वांच्या सह्या १९. नदी, तरंगिणी २१. धीर सोडणे, खचणे २२. फिकीर, पर्वा २३. बाहेरचा, दूरस्थ २४. पेठ, मोहल्ला २५. सुदृढ, आरोग्यवान २६. वासरू २९. निशा, रजनी ३०. श्रीकृष्ण ३४. मरायला टेकलेला ३८. कसेबसे रेंगाळत चाललेले काम ४२. कुबेराचा सेवक ४३. पोहण्यासाठी उंचावरून पाण्यात झेप घेणे ४५. उत्कर्ष, चलती ४७. कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडालेला प्रदेश ५०. गाण्यातील एक राग ५१. कर्ज देणारा, धनको ५३. कंप्युटर ५४. न समजणारे, दुर्बोध ५६. फुलातील रेणू ५८. हंगाम, फुलोरा ६०. प्रयत्नांवाचून लाभलेला ६२. पांडवांना राजवाडा बांधून देणारा ६४. बोभाटा ६७. छोटे तालवाद्य ६८. मोठा ६९. जन्म, पैदास ७०. किमतीतील सूट, डिस्काउंट ७२. शांतवन ७४. यश, साफल्य ७५. परिस्थितीचा दबाव ७६. श्रीराम ७८. पाणी भरण्याचे भांडे, डेग ७९. किंमत, मूल्य ८०. शंकराचे मंदिर ८२. मोठा माठ, डेरा ८३. शिखा ८४. जाणे, प्रयाण ८६. ईर्ष्या, चुरस ८७. वागण्यावर असलेली मर्यादा ९०. मोठा भाऊ ९१. डोके, मस्तक ९२. ढोंग, भोंदूगिरी ९३. विक्री, मार्केटिंग ९५. तक्रारीचा सूर, पिरपिर ९६. स्तंभ ९७. धनुष्य ९९. शेत, शेतजमीन १००. फोडणीचे ताक १०१. अतिरिक्त, जास्तीचे १०२. बोगस, दुर्लक्ष करण्याजोगा १०३. बाजेची जाड सुती पट्टी १०४. पावाला लावण्याचे लोणी १०५. जास्वंदीचे फूल १०६. डोंगळा, मोठी मुंगी १०७. झोपडी १०८. अन्ननलिका व लहान आतड्याच्या मधला अवयव १०९. मैत्रीण, सखी

**उभे शब्द –**

१. ज्याला विशिष्ट रंग दिसत नाहीत असा २. रिकामा वेळ, फुरसत, प्रसंग ३. नियमित येणे-जाणे ४. पराक्रमी ६. खात्रीपूर्वक ७. गुप्तचर, जासूस ८. अफवा, वावडी ८. स्त्रियांचा गळ्यातला दागिना ९. निळा रंग १०. तळहाताचा प्रहार ११. फोडणीचे ताक १४. कोवळी फांदी १६. गणपती १७. गोड, मधुर २०. मोकळा, रिता २२. त्याप्रमाणे, त्यासारखा २३. अब्रू २४. पसंती २७. ब्रीद २८. खाद्य २९. पांडवांनी केलेला यज्ञ ३१. पकडणे, ठिय्या आंदोलन ३२. नगद, कॅश ३३. संयमपूर्ण ३५. युद्धभूमी ३६. आसरा, आश्रय ३७. निष्ठा ३९. सरोवर ४०. इमारतीच्या पायात भरलेले ओबडधोबड दगड ४१. होडी ४४. मनोहर, रम्य ४६. केर ४७. शोधासाठी शर्थीचे प्रयत्न करणे - xxxx पछाडणे ४८. अदा ४९. प्राणघातक पेय, विष ५१. साधर्म्य ५२. श्रीकृष्णकथेतील महासर्पाचे नाव ५५. हनुमानाचे शस्त्र ५६. पंख ५७. आकाश, अंबर ५९. गोंधळ, भंबेरी ६०. गगनजाई, बुचाची फुले ६१. ठोक, मार ६२. पितृपंधरवडा ६३. शहाणा ६५. पंचानन, सिंह ६६. देवांचा राजा, इंद्र ६८. लोकरी गळपट्टा ६९. निगा न राखलेले राठ केस ७१. चीर, भेग ७३. त्वचेवर लावण्याचे औषध ७४. वरचढ, अधिक श्रेष्ठ ७७. मोठा हातोडा ८१. मृत्यूदंड देणे ८२. मातीचा तवा ८३. भित्रा, भेकड ८५. प्राक्तन, दैव ८८. आठवड्यातील सुट्टीचा दिवस ८९. क्रिकेटमधली एक वाईट चेंडूफेक, यंत्रातील घर्षणरोधक ९०. दरवाजा ९०अ. स्वाभिमानी, करारी ९२. तल्लीन ९४. प्रणाम ९६. स्कंध ९७. पिंजरा ९८. गरीब ९९. पारध १०१. रुंद, लठ्ठ १०२. मोडणे, मोडतोड १०३. अभिनेत्री १०४. ऋषीमुनींचे घर १०५. ज्याप्रमाणे •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६४३ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. कृषीवल ५. रीम ६. जटिल १०. क्लांत ११. रडतराऊत १३. साल १४. लतामंडप १६. कृतक १७. नव १८. भावार्थदीपिका २१. तगडा २२. सत्य २३. सवय २५. खतम २६. तारीफ २८. वितान ३०. बळे ३१. मागोवा ३३. लाभ ३५. वपा ३७. बेट ३८. दुर्ग ३९. घनदाट ४२. द्रव ४३. अलगद ४५. वासर ४७. खर ४९. सैन्य ५०. नीलम ५१. वटवट ५३. मनमोहन ५५. इसब ५६. व्यवस्थापक ५८. सदा ५९. घट ६०. मिस्त्री ६१. दरवळ ६२. अनारसा ६४. कूप ६५. काठी ६६. चालू ६८. सुनीत ६९. जमीन ७१. चोप ७२. वायफळ ७३. मननीय ७६. लीन ७८. बालंट ७९. वादन ८१. शयनयान ८४. रमण ८६. पारपटल ८८. शची ८९. मध ९०. कामना ९१. देह ९२. शास्त्र ९३. सवंग ९५. पालवणे ९६. पटकन ९९. तरवणी १०१. सरसू १०३. वाजी १०४. पदाधिकारी १०६. मग १०७. मानस १०८. ठरावीक १०९. लघळ ११०. रस्सी

**उभे शब्द** : १. कृतकृत्यता २. वरकस ३. लड ४. सराव ५. रीतभात ६. जलदी ७. ललकारी ८. श्रीमंत ९. उपडा १२. तनय १३. सार्थ १५. डगला १९. वाम मार्ग २०. पिता २२. सविता २४. वधू २५. खळे २७. फलाट २९. नवल ३०. बटवा ३२. वाघ ३४. प्रवचन ३६. पागनीस ३८. दूरवस्था ४०. नख ४१. दारमदार ४३. अन्य ४४. दलबदलू ४६. कवक ४८. अमोघ ४९. सैल ५२. टपरी ५४. हटकून ५५. इस्त्री ५६. व्यवसाय ५७. वळ ५८. सनातनी ६०. मिठी ६२. अनीन ६३. साज ६५. काबुली ६६. चापबाण ६७. पळवाट ६८. सुमन ७०. मीलन ७२. वाट पाहणे ७४. यश ७५. मनधरणी ७७. नरम ८०. दल ८२. यशवंत ८३. याम ८५. मनापासून ८७. परोपजीवी ८८. शस्त्र ९०. कापूस ९१. देवकी ९२. शानदार ९४. गरम ९७. कप ९८. निकाल १००. वगर १०२. रमा १०३. वारा १०५. रीघ

## माहिती अधिकार कायदा कमकुवत करण्याचा प्रयत्न

**रोहित पवारांचा आरोप**

■ मुंबई

**माहितीचा** अधिकार कायद्यात केलेल्या नव्या बदलांमुळे प्रशासनातील भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार उघड करण्यासाठी नागरिकांच्या हातात असलेले प्रभावी हत्यार कमकुवत करण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात असल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला. त्यांनी नव्या अटींमुळे माहिती मिळवण्याची प्रक्रिया कठीण होणार असल्यामुळे सरकारने ते तातडीने मागे घेण्याची मागणी केली.

रोहित पवार यांनी एक्सवर लिहिले की, माहिती अधिकार कायद्यात बदल करून प्रशासनातील भ्रष्टाचार उघड करण्यासाठीचे हे प्रभावी हत्यारच बोथट करण्याचा प्रयत्न या सरकारने केला आहे. माहिती अधिकार अर्जामध्ये माहिती मागण्याचे कारण नमूद करण्याची नवीन अट घातली असून, अर्जासाठीच्या शुल्कातही वाढ करण्यात आली. तसेच आधी अपिलासाठी कोणतेही शुल्क नसताना आता प्रथम आणि द्वितीय अपिलासाठीही शुल्क भरावे लागणार आहे. शिवाय माहिती मागणाऱ्याचे ओळखपत्र, भारतीयत्त्वाचा पुरावा अशी कागदपत्रे मागवून अर्जदारावर वाढीव खर्चाचा भुर्दंड लादला जात आहे. हे बदल म्हणजे सहज माहिती उपलब्ध होऊ नये म्हणून माहिती मागण्याच्या मार्गात घातलेले स्पीड ब्रेकर आहेत. हे बदल सरकारने तातडीने रद्द करून पारदर्शकता कायम ठेवावी.

## जेजुरी गड हिरवागार होणार! पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते १,००० वृक्षारोपणाचा शुभारंभ

■ जेजुरी

**महाराष्ट्र** शासनाच्या वन विभाग व श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट, जेजुरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला हरित कडेपठार उपक्रम २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अरण्यषष्ठीच्या निमित्ताने एक पाऊल निसर्ग संवर्धनाकडे या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाचा शुभारंभ पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कडेपठार परिसर हिरवागार करण्याच्या उद्देशाने १,००० देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक, भाविक, विद्यार्थी आणि पर्यावरणप्रेमींनी सहभाग नोंदवून वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले, आपली तीर्थस्थळे आणि आध्यात्मिक केंद्रे ही निसर्ग संवर्धनाची उर्जाकेंद्रे आहेत. प्रत्येकाने दर्शनाबरोबरच निसर्ग संवर्धनाची प्रेरणा घेतली, तर पर्यावरण संरक्षणाची चळवळ अधिक व्यापक होऊ शकते. भारतीय संस्कृतीने अनादीकालापासून निसर्ग आणि देवत्व यांचे अतूट नाते जपले आहे. तापमानवाढ आणि पर्यावरणीय बदलांच्या समस्यांवर मात करण्यासाठी निसर्गाशी सुसंवाद साधणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. सर्वसामान्य भाविकांनी निर्धार केला तर प्रत्येक आध्यात्मिक केंद्र हिरवागार होऊ शकते. यावेळी देवराई फाऊंडेशनचे रघुनाथ ढोले यांनी 'देवरायांचे महत्त्व' या विषयावर उपस्थितांना आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच सह्याद्री देवराई प्रतिष्ठानचे संस्थापक व प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे उपस्थितांशी संवाद साधत उपक्रमाचे कौतुक केले. पुढील भेटीत लागवड केलेल्या सर्व वृक्षांची पाहणी करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

## रत्नागिरीतील भातपिके धोक्यात टँकर, हंड्याने पाणी देण्याची वेळ

■ रत्नागिरी

**जिल्ह्यात** मान्सूनच्या लांबलेल्या आगमनामुळे आणि वाढत्या उष्णतेमुळे भात पिकांना पाणी देण्याची गंभीर वेळ आली आहे. उगवून आलेली भातरोपे करपून दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. त्यामुळे शेतकरी सध्या टँकर आणि हंड्यांच्या सहाय्याने पाणी देऊन पिके वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत.

रत्नागिरी तालुक्यातील दांडेआडम गावातील शेतकर्यांनी सहकार तत्वावर १० ते १२ हजार लिटर क्षमतेचे पाण्याचे टँकर भाड्याने आणून भाताची रोपे जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.तर काही भागातील महिला पहाटेपासून विहिरी आणि आटत चाललेल्या नाल्यांमधून डोक्यावर हंडा-कळशीने पाणी आणून शेतात घालत आहेत.हवामान विभागाने १ जुलैपासून पावसाचा अंदाज वर्तविल्याने तोपर्यंत पिके जिवंत ठेवण्याचे मोठे आव्हान या शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे.दरम्यान, जिल्ह्यातील धरणसाठे झपाट्याने कमी होत असल्याने पिण्याच्या पाण्याच्या नियोजनासाठी प्रशासनाकडून उपाययोजना केल्या जात आहेत. अशातच महाराष्ट्र औद्योगिक विकास योजनेंतर्गत पानवल धरणाच्या महामंडळाच्या विशेष स्मार्ट सिटी मजबुतीकरण व नूतनीकरणाच्या कामाचा शुभारंभ पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आला. त्यामुळे निदान पिण्याच्या पाण्यासाठी तरी नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

## बदलापूरजवळ बीएमडब्लूचा अपघात! २ जण जागीच ठार

■ बदलापूर

**बदलापूर** : बदलापूरजवळील मुंबई-वडोदरा महामार्गावर आज पहाटे एका भरधाव बीएमडब्लू कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक तरुणी गंभीर जखमी झाली. जखमी झालेल्या तरुणीला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. तिची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

हा अपघात पहाटे सुमारे २ वाजताच्या सुमारास एरंजाड परिसरात घडला. बीएमडब्लू कार टिटवाळ्याकडून बदलापूरच्या दिशेने येत होती. ती दुभाजकावर आदळली अनेक वेळा उलटली. या अपघातात कारमधील एक पुरुष आणि एका महिलेचा जागीच मृत्यू झाला.

## 'नीट'ची पुनर्परीक्षा अखेर कडेकोट सुरक्षेत पार पडली

पान १ वरून

विद्यार्थिनीने आरोप केला की, परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यापूर्वी तिला बुरखा काढण्यास सांगितले. या विद्यार्थिनीने सांगितले की, ३ मे रोजी झालेल्या परीक्षेलाही तिने हाच पोशाख करून परीक्षा दिली होती. एनटीएने परवानगी दिली असेल, तर इतर कुणी मला आम्हाला रोखू शकत नाही. या पोशाखात परीक्षा देऊ दिली नाही, तर मी परीक्षा देणारच नाही. माझ्यासाठी परीक्षा महत्त्वाची नाही, माझी ओळख आणि माझा बुरखा महत्त्वाचा आहे. तर गुजरातमधील अहमदाबादच्या वस्त्रापूर भागातील परीक्षा केंद्रात काही मुस्लिम विद्यार्थिनींना हिजाब काढण्यास सांगण्यात आल्याचा आरोप केला. त्याचवेळी काही हिंदू विद्यार्थ्यांच्या हातातील कलावा (पवित्र गंडा) सुरक्षा तपासणीदरम्यान कापल्याची तक्रार पालकांनी केली. या घटनेनंतर केंद्राबाहेर पालकांनी आक्षेप घेतला. पोलिसांनी नंतर स्पष्ट केले की, काही सुरक्षा कर्मचाऱ्यांना परीक्षेच्या मार्गदर्शक सूचनांची पुरेशी माहिती नव्हती. त्यानंतर मुस्लीम विद्यार्थिनींना हिजाबसह प्रवेश देण्यात आला, तर हिंदू विद्यार्थ्यांनाही कलावा ठेवण्याची परवानगी देण्यात आली. मात्र ज्यांचे कलावे आधीच कापण्यात आले होते, त्यांच्या पालकांनी नाराजी व्यक्त केली. हरियाणातील गुरुग्राममध्येही काही विद्यार्थ्यांनी गळ्यातील रुद्राक्ष माळ काढल्याचा आणि हातातील लाल-काळे धार्मिक दोरे कापल्याचा आरोप केला. कादीपूर वरिष्ठ माध्यमिक विद्यालय आणि सेक्टर-९ येथील सरकारी महाविद्यालयासह काही केंद्रांवर या घटना घडल्याचे पालकांनी सांगितले. राजस्थानमधील अलवर येथे एका विद्यार्थिनीला जुन्या प्रवेशपत्रामुळे धावपळ करावी लागली. ती मे महिन्यातील परीक्षेच्या जुन्या केंद्रावर पोहोचली होती. दस्तऐवज तपासणीदरम्यान तिचा रोल नंबर आणि परीक्षा केंद्र बदलल्याचे अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. ऑनलाईन नोंदी तपासल्यानंतर तिचे खरे परीक्षा केंद्र राजगढ येथे असून, ते सुमारे ४० किलोमीटर दूर होते. कुटुंबीय निघून गेले असल्याने शाळा प्रशासनाने वाहनाची व्यवस्था करून तिला वेळेत योग्य केंद्रावर पोहोचवले. मुंबईत कुर्ला आणि डोंबिवली येथील दोन विद्यार्थी परीक्षा केंद्रावर निर्धारित वेळेनंतर पोहोचल्याने त्यांना प्रवेश नाकारण्यात आला. कर्नाटकातील बंगळुरूमध्येही दुपारी १.३० नंतर परीक्षा केंद्रावर पोहोचल्यामुळे चार विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आला. त्यांच्या पालकांनी कॉँग्रेसच्या रॅलीमुळे वाहतूक कोंडी झाल्याचा आरोप केला. मात्र परीक्षा अधिकाऱ्यांनी एनटीएच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वेळेनंतर प्रवेश देता येणार नाही, अशी भूमिका घेतली. या परीक्षेत पेपरफुटी रोखण्यासाठी पहिल्यांदाच भारतीय वायुसेनेची विमाने आणि हेलिकॉप्टर वापरण्यात आली. वायुसेनेने २०० हून अधिक उड्डाणे करून प्रश्नपत्रिका देशभरातील वेगवेगळ्या झोनपर्यंत पोहोचवल्या. दरम्यान, दरम्यान, पेपरफुटी प्रकरणाचा तपास सीबीआयकडून सुरू असून, अनेक संशयितांना अटक करण्यात आली आहे.

## तामिळनाडूत अमोनिया गॅस गळतीत ७ जणींचा मृत्यू

■ तिरुवल्लूर

**तामिळनाडूतील** तिरुवल्लूर जिल्ह्यातील एका सीफूड प्रक्रिया कारखान्यात शनिवारी अमोनिया गॅसची गळती झाल्याने ७० हून अधिक कामगार बाधित झाले. त्यापैकी सहा महिला कामगारांचा मृत्यू झाला असून, ६५ हून अधिक कामगारांची प्रकृती गंभीर आहे. गॅस गळतीचे कारण शोधण्यासाठी प्रशासनाने चौकशी सुरू केली आहे. या दुर्घटनेत किमान दोन स्थलांतरित कामगारांचा मृत्यू झाला असून ७० हून अधिक कामगार गॅसमुळे बाधित झाले आहेत.

प्रभावित कामगारांमध्ये उत्तर भारतातील विविध राज्यांतील स्थलांतरित कामगारांचाही समावेश आहे. गॅस गळतीनंतर अनेकांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. तसेच इतर आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या. त्यानंतर त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## प्रत्येक फुटीर जे कारण देतो तेच दिले

पान १ वरून

म्हणाले होते की, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्याबाबत मी कोणत्याही पत्रकार परिषदेत किंवा माध्यमांमध्ये काहीही बोललेलो नाही. भविष्यातही काही बोलणार नाही. पक्षाबाबत कोणताही निर्णय मी अद्याप घेतलेला नाही. तरीही माझ्या संपूर्ण कुटुंबाची बदनामी करण्यात आली, तेही मी सहन केले. या राजकीय प्रक्रियेत माझ्या कुटुंबाने तुमचे नेमके काय बिघडवले आहे? केवळ एका चर्चेमुळे मी इतका वाईट ठरलो का? 'रीलस्टार' म्हणून मला हिणवण्यात आले. पण जर मी फक्त रीलस्टार असतो, तर जनतेने मला एवढ्या मतांनी निवडून दिले असते का?

उबाठाचे हिंगोलीचे बंडखोर खासदार नागेश पाटील-आष्टीकर यांनी आज प्रथमच आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले की, मी उद्धव ठाकरे यांच्यावर नाराज नाही. उद्धव ठाकरे यांनी मला खूप प्रेम दिले. संजय राऊत किंवा आणखी कोणी बोलत असेल तर त्यांचाही माझ्यावर हक्क आहे. त्यामुळे ते माझ्याविरोधात बोलले तरी मला वाईट वाटणार नाही. १८ तारखेपर्यंत आम्ही कोणीही कुठेच गेलेलो नव्हतो. मात्र, ज्या पद्धतीने अविश्वास दाखवला गेला किंवा बोलण्याचा अतिरेक झाला, त्यामुळे बऱ्याच मंडळींनी असा विचार केला की, आता उबाठात थांबून काही उपयोग होणार नाही. सत्तेशिवाय कोणतीही कामे होत नाहीत. त्यामुळे मी हे पाऊल उचलले आहे. माझ्या मतदारसंघात विकासकामे करावी लागतील, लोकांनी मला खूप मोठ्या अपेक्षेने निवडून दिलेले आहे. त्यामुळे मला लोकांची कामे करणे क्रमप्राप्त आहे. विकासासाठी कुठलाही निधी मिळत नव्हता. केवळ खासदारांना मिळणारा ५ कोटींचा निधी गावोगावच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अतिशय अपुरा पडतो. प्रत्येक गावात गेल्यावर लोकांना विकासाची अपेक्षा असते. जर निधीच नसेल, तर मी लोकांची कामे कशी करू? माझा निर्णय कदाचित काहींना पटला असेल, तर काहींना पटला नसेल.

## १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन

पान १ वरून- अहमदाबादमध्ये, तर केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा यांनी विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दिल्लीतील राजनैतिक अधिकाऱ्यांसोबत योग केला.याशिवाय केंद्रीय मंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री, लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, जवान आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले. योगामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्वास्थ्य आणि भावनिक संतुलन साधता येते, असा संदेश देत देशभर योगमय वातावरण निर्माण झाले.

## रेवती सुळे-सारंग लखवानी विवाह अदानी, अंबानी सहकुटुंब उपस्थित

पान १ वरून

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्हीलचेअरवरून आपल्या नातीच्या विवाहसोहळ्याला हजेरी लावत नवदाम्पत्याला आशीर्वाद दिले. विवाहसोहळ्याला देशातील राजकारण, उद्योग आणि मनोरंजन क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित होते. बॉलिवूडचा किंग खान शाहरुख खान यानेही या सोहळ्याला हजेरी लावली. शाहरुखने रेवती सुळेसोबत नृत्य करत आपल्या खास शैलीत आयकॉनिक पोज दिली.

या विवाह सोहळ्याला काँग्रेस नेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत, मनसे अध्यक्ष राज ठाकरे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार, जयंत पाटील उपस्थित होते. याशिवाय पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला, ओमर अब्दुल्ला, द्रमुकच्या खासदार कनिमोळी, दिग्विजय सिंग, के. सी. वेणुगोपाल, निशिकांत दुबे आणि अनुराग ठाकूर यांनीही नवदाम्पत्याला शुभेच्छा दिल्या. रिलायन्स समूहाचे मुकेश अंबानी, नीता अंबानी, अनंत अंबानी, राधिका अंबानी, अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी, प्रीती अदानी तसेच अनिल अंबानीदेखील विवाहाला उपस्थित होते. अभिनेता अमिताभ बच्चन, करण जोहर यांच्यासह अनेक कलाकारांनी विवाहाला उपस्थित राहून नवदाम्पत्याला शुभेच्छा दिल्या.

## पाणी, अन्न, वीज रोखले आम्ही दहशतवादी आहोत का?

पान १ वरून

धरणे सुरूच ठेवण्याचा निर्णय अभिजित दीपकेयांनी घेतला. पोलिसांच्या इशाऱ्यानंतरही आंदोलकांनी रात्रभर ठिय्या आंदोलन सुरू ठेवत धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी घोषणाबाजी केली. हातात फलक घेत, थाळ्या आणि चमचे वाजवून त्यांनी सरकारचा निषेध नोंदवला. अभिजित दीपके म्हणाला की, जोपर्यंत धर्मेंद्र प्रधान राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरूच राहील. पेपरफुटी का होत आहे? कारण त्यांना कोणतीही भीती नाही. त्यांना वाटत नाही की, त्यांनी निष्काळजीपणा केला म्हणून त्यांचा राजीनामा घेतला जाईल. जेव्हा एखाद्या मंत्र्याची खुर्ची जाईल, तेव्हाच मनात भीती निर्माण होईल. त्यानंतर जो कोणी मंत्री बनेल, त्यालाही ही जाणीव असेल की पेपरफुटी झाली तर पद गमवावे लागू शकते. सध्या ही भीतीच नसल्यामुळे वारंवार पेपरफुटीच्या घटना घडत आहेत. याबाबत सरकारशी कोणतीही चर्चा झालेली नाही. उलट सरकार आमचे पाणी बंद करत आहे, आमचे अन्न रोखत आहे, आमची वीज तोडत आहे. आम्हाला दहशतवाद्यांप्रमाणे वागणूक दिली जात आहे. आम्ही विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी लढत आहोत, तरीही आम्हाला अशी वागणूक का दिली जात आहे? मी सर्व नीट विद्यार्थ्यांना विनंती करतो की, आधी तुम्ही तुमची परीक्षा द्या. माझ्याकडून तुम्हा सर्वांना शुभेच्छा. परीक्षा संपल्यानंतर तुमचे मित्र आणि कुटुंबियांसह जंतर-मंतर येथे या. कारण ही लढाई धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय थांबणार नाही. आमचा सध्या उपोषणाचा कोणताही निर्णय झालेला नाही. सध्या आम्ही आमच्या हक्कासाठी आवाज उठवत आहोत. मात्र गरज पडली, तर उपोषणाचाही मार्ग स्वीकारू. मला अटक झाली किंवा येथे उपस्थित असलेल्या लोकांना अटक झाली तर देशभरातील युवक रस्त्यावर उतरतील. हे आंदोलन आधीच उभे राहिले आहे. कारण हा प्रश्न एका विद्यार्थ्याचा नाही. एक कोटीहून अधिक विद्यार्थ्यांवर अन्याय झाला आहे. हे सर्व विद्यार्थी त्यांच्या हक्कासाठी लढतील. सरकारकडून कोणतेही सहकार्य मिळत नाही उलट ते आम्हाला मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवत आहेत. त्यामुळे आम्ही आंदोलन अधिक तीव्र करण्यास तयार आहोत.

शुद्ध व नैसर्गिक
फोंडाघाट मध
ॲगमार्क
फोंडाघाट फार्मसी
मुंबई - १६. फोन : २४३० ८५४२

# नवाकाळ

• मुंबई । सोमवार २२ जून, २०२६ • पान -८

## कैलास मानसरोवर यात्रेकरूंची पहिली तुकडी नथुलामार्गे रवाना

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**गंगटोक-** यंदाच्या कैलास मानसरोवर यात्रेचा अधिकृत शुभारंभ झाला असून, ४४ यात्रेकरूंचा समावेश असलेली पहिली तुकडी काल शनिवारी सिक्कीममधील नथुला खिंड ओलांडून चीनच्या तिबेटमध्ये दाखल झाली आहे. सिक्कीमचे राज्यपाल 'ओम प्रकाश माथुर' आणि पर्यटन मंत्री यांच्या उपस्थितीत पहिल्या तुकडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. या पहिल्या समूहामध्ये विविध राज्यांतील ३० ते ७० वयोगटातील भाविक सहभागी झाले आहेत परराष्ट्र मंत्रालय दरवर्षी जून ते सप्टेंबर दरम्यान सिक्कीमचा नथुला मार्ग आणि उत्तराखंडचा लिपुलेख खिंड मार्ग या दोन मुख्य मार्गांनी यात्रेचे आयोजन करते.

## सुप्रिया सुळेंच्या कन्येच्या विवाह समारंभाला नेते, अभिनेते उपस्थित


शरद पवारांसोबत नवदाम्पत्य


काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी


अखिलेश यादव पत्नीसह


कपूर खानदान


एमआयएमचे ओवेसी


आपचे संजय सिंह


शरद पवार


जय पवार, दत्ता भरणे, सुनेत्रा पवार, पार्थ पवार, झिरवळ


सुप्रिया सुळे


अमृता फडणवीस व कन्या


शाहरुख खानचे खास नृत्य


मंगलप्रभात लोढा


रेवतीच्या लग्नात अदानी पतीपत्नी आणि जितेंद्र आव्हाड यांनी केलेले स्वागत


उद्धव ठाकरे कुटुंबीय


उद्योगपती मुकेश, निता आणि अनंत अंबानी



बंडखोर खासदार संजय दिना पाटील मध्यरात्री दाखल झाले


बच्चन कुटुंब


## आंतरराष्ट्रीय योग दिनाचा उत्साह


पंतप्रधान मोदी


राष्ट्रपती मुर्मू


राजनाथ सिंह


कोलकाता हावडा ब्रिज लगत योगदिन


अमृता फडणवीस


योगी आदित्यनाथ



देवेंद्र फडणवीस


निर्मला सितारामन


एकनाथ शिंदे


भारतीय नौदल, मुंबई


शिल्पा शेट्टी


योगगुरू रामदेव बाबा


राज्यपाल जिष्णू वर्मा


तिस्ता नदीकाठी


आयटीबीपीच्या जवानांचा पँगॉन्ग त्सो येथे योगा

## २३ जूनला लडाख बंदची हाक आश्वासन पूर्ण न झाल्याने नाराजी

■ लेह

**लडाखच्या** राजकीय आणि घटनात्मक भवितव्याबाबत केंद्र सरकारने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली नाही. तसेच केंद्र सरकारने लडाखसंदर्भातील महत्त्वाच्या निर्णयांची इतिवृत्तात अधिकृत नोंदच न केल्याचा आरोप करत लेह पेक्स बॉडी व कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्स यांनी २३ जून रोजी लडाख बंदची हाक दिली आहे.

लेह येथे आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत 'लेह पेक्स बॉडी' चे सह-अध्यक्ष छेरिंग डोरजे यांनी सांगितले की, २२ मे रोजी गृहमंत्रालयाच्या उपसमितीच्या बैठकीत लडाखसाठी विधिमंडळ, कार्यकारी व आर्थिक अधिकार असलेली लोकशाही रचना तसेच प्रस्तावित कलम 'ए-७१ के' अंतर्गत घटनात्मक संरक्षण यावर चर्चा झाली होती. कलम 'ए-७१ के' हे मणिपूर राज्याशी संबंधित आहे. या कलमांतर्गत मणिपूरच्या डोंगराळ अथवा पहाडी भागांच्या प्रशासनासाठी व तेथील आदिवासींच्या हिताचे रक्षण करण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. बैठकीत संपूर्ण नोकरशाही, मुख्य सचिवांसह, लडाखच्या लोकनियुक्त नेतृत्वाच्या अधिपत्याखाली काम करेल, याबाबतही सहमती झाली होती. मात्र, या महत्त्वाच्या निर्णयांचा बैठकीच्या अधिकृत इतिवृत्तात योग्य उल्लेख करण्यात आलेला नाही.

## ब्रिटिश पंतप्रधान राजीनामा देणार? १०० हून अधिक खासदारांचे बंड

■ लंडन

**अंतर्गत** नेतृत्व संकट आणि कमी होत चाललेला जनाधार यामुळे अडचणीत सापडलेले ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टारमर हे उद्या राजीनामा देण्याची शक्यता असल्याचा दावा ब्रिटिश माध्यमांनी केला आहे. स्टारमर यांच्या पक्षातील १०० हून अधिक खासदारांनी सार्वजनिकरित्या त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. अंतिम निर्णय घेण्यापूर्वी स्टारमर यांनी आपल्या पत्नीशी चेकर्स येथील अधिकृत निवासस्थानी चर्चा केली. मात्र, लेबर पक्षातील वरिष्ठ नेत्यांना त्यांच्या राजकीय भवितव्याबाबत सोमवारीच



स्पष्ट घोषणा होण्याची अपेक्षा आहे.

जुलै २०२४ मध्ये लेबर पार्टीला मिळालेल्या प्रचंड विजयामुळे स्टारमर ब्रिटनचे पंतप्रधान बनले होते. या विजयाने तब्बल १४ वर्षांची कंझर्व्हेटिव्ह पक्षाची सत्ता संपुष्टात आली होती. मात्र त्यानंतरच्या जवळपास दोन वर्षांच्या काळात विविध वाद, घोटाळे आणि धोरणांमधील घुमजाव यामुळे स्टारमर यांची लोकप्रियता झपाट्याने घसरली. जीवनमान सुधारण्याची दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात ते अपयशी ठरल्याची भावना मतदारांमध्ये निर्माण झाली. स्टारमर यांच्या पक्षातील १०० हून अधिक खासदारांनी सार्वजनिकरित्या त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

## डोंबिवलीत राज ठाकरे, मराठी माणसांबद्दल आक्षेपार्ह पोस्ट

■ डोंबिवली

**मनसे** अध्यक्ष राज ठाकरे आणि मराठी माणसांबद्दल सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याच्या आरोपावरून डोंबिवलीत काही काळ तणावाचे

### मनसैनिक आक्रमक

वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणात रामनगर पोलिसांनी संबंधित तरुणाला ताब्यात घेतले असून, त्याच्याविरोधात कठोर कारवाईची मागणी मनसेकडून करण्यात आली आहे.

एका तरुणाने आपल्या सोशल मीडिया स्टेटसवर राज ठाकरे आणि मराठी समाजाबद्दल आक्षेपार्ह मजकूर पोस्ट केल्याचा आरोप आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते आक्रमक झाले व त्यांनी रामनगर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत संबंधित तरुणाला ताब्यात घेतले. या घटनेनंतर परिसरात काही वेळ तणाव निर्माण झाला होता. यावर प्रतिक्रिया देताना मनसे पदाधिकारी राहुल कामत म्हणाले की, समाजात तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी.